POSTEL NO.L/RNP/172/RENEWAL/2023-25

दैनिक

# जयमहाभारत

संपादक-विजयकुमार सुखदेवराव वाव्हळ

www.dainikmahabharat.com | RNI No. MAHMAR/2015/64418 | jaymahabharat2015@gmail.com

महाराष्ट्र | बीड (महाराष्ट्र) | दैनिक | मराठी | वर्ष ११ वे | अंक ६३ | शनिवार दि.१८ ऑक्टोबर २०२५ | किंमत २ रू. | पाने ४

छत्रपती संभाजीनगर, नागपुर, नाशिक, मुंबई, रायगड, पुणे, कोल्हापुर, अहिल्यानगर, अमरावती, ठाणे, सोलापूर, नांदेड, लातुर, धुळे, जालना, धाराशिव, मुंबई, हिंगोली, परभणी, जळगांव, वर्धा, सातारा येथुन प्रकाशित होणारे मराठवाड्यातील एकमेव दैनिक

# विखे आला आणि सर्व महाराष्ट्रामध्ये विखार पसरवून गेला





## छगन भुजबळांचा विखे पाटलांवर हल्लाबोल

प्रतिनिधी @ बीड

मराठा समाज आणि आमच्या अंतर पडले ते अंतर अंतरवलीच्या दरीद्री पाटलामुळे पडले आहे, असे म्हणत मंत्री छगन भुजबळ यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्यावर टीका केली. आरक्षण सामाजिक दृष्ट्या मागासलेल्यांसाठी आहे. तो गरिबी हटावचा कार्यक्रम नाही असे भुजबळ म्हणाले. यावेळी बोलताना भुजबळ यांनी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर देखील टीका केली. विखे आला आणि सर्व महाराष्ट्रामध्ये विखार पसरवून गेला. गेला तर गेला पण जीआर काढला अशी टीका भुजबळ यांनी केली. विखे पाटील कारण नसताना जरांगेकडे जातात. भाजपच्या लोकांना मला सांगायचे की तुमच्या लोकांना आवरा असेही भुजबळ म्हणाले.

दुहेरी लढाई लढणार आहे. एक न्यायालय आणि दुसरी रस्त्यावरची लढाई असे भुजबळ म्हणाले. आम्ही

(उर्वरीत पान २ वर)

### विजय वडेट्टीवार यांच्यावरही भुजबळांची टीका

भुजबळ यांनी विजय वडेट्टीवार यांच्यावर देखील टीका केली. नगरला आले नाहीत, पंढरपूरला आले नाहीत, बीडला आले नाहीत, कुठला दबाव तुमच्यावर आहे. तुम्ही सांगितलं होतं तुमच्याबरोबर आहे. मग तुम्ही का नाही आलात ? असा सवाल भुजबळांनी केला. यावेळी भुजबळ यांनी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांचा एक व्हिडीओ दाखवला. यामध्ये विजय वडेट्टीवार यांनी मनोज जरांगे पाटील ायंची आंदोलस्थळी भेट घेतल्याचे दिसत आहे.



## यंदा काळी दिवाळी

प्रतिनिधी @ बीड

राज्यात सध्या दिवाळीचा उत्साह पाहायला मिळत आहे. त्यातच आता काँग्रेसने सरकारचा निषेध करण्यासाठी काळी दिवाळी साजरी करा असे आवाहन केले आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी राज्यातील शेतकरीविरोधी धोरणांवरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार सरकारवर जोरदार हल्ला चढवला. अतिवृष्टीग्रस्त शेतक-यांसाठी सरकारने केलेली मदत केवळ बनवाबनवी आहे. या फसवणुकीमुळे शेतक-यांवर यंदाची दिवाळी काळी दिवाळी म्हणून साजरी करण्याची वेळ आली आहे असे विजय वडेट्टीवार म्हणाले.

या सरकारचा निषेध म्हणून दिवाळीच्या दिवशी एक तास महाराष्ट्रात सर्व शेतक-यांनी काळी दिवाळी साजरी करुया. यावेळी सर्वांनी दिवे बंद करून या सरकारचा निषेध करावा. शेतक-यांच्या भावना लक्षात घेण्यासाठी मी सर्वांना आवाहन करतो आहे असे आवाहन विजय वडेट्टीवार यांनी केले. यावेळी विजय वडेट्टीवार यांनी सरकारचे दोन जीआर लोकांसमोर मांडले. सरकारने काढलेल्या ९ तारखेच्या जीआरमध्ये अतिवृष्टीग्रस्त शेतक-यांसाठी जमीन महसुलात सूट, कर्जाचे पुनर्गठन, कर्जवसुली स्थगिती आणि परीक्षा शुल्कात माफी अशा सवलतींचा उल्लेख होता. मात्र

(उर्वरीत पान २ वर)

## राज्यातील १४३ बँकांवरील निर्बंध आरबीआयने हटविले

प्रतिनिधी @ बीड

पुणे : भारतीय रिझर्व्ह बँकेने राज्यातील आर्थिक अडचणीत आलेल्या नागरी सहकारी बँकांवर सर्वसमावेशक निर्बंध (ऑल इन्क्लुझिव्ह डायरेक्शन्स तथा एआयडी) तसेच सुपरवायजरी क्शन फेमवर्क अर्थातच सॅफही लागू केले होते. म्हणजेच सॅफ व एआयडी या निर्बंधातून बँका बाहेर आल्या आहेत. संबंधित बँकांनीही नवीन सभासद बनविणे, भागभांडवल उभारणी व कर्जे वसुलीवर भर दिल्यामुळे दोन वर्षात राज्यातील १४३ बँकांवरील असे निर्बंध आरबीआयने हटविले असल्याची माहिती राज्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी दिली.



राज्यात सुमारे ५५० नागरी सहकारी बँका कार्यरत आहेत. जगावर संकट आलेल्या कोरोना महामारीमुळे सर्वच क्षेत्रावर विपरित परिणाम झाला होता. कोरोना काळात बँकांची थकीत कर्जे राहण्याचे प्रमाण वाढले आणि एकूणच बँकिंग व्यवहारावर झालेल्या विपरित परिणामामुळे आरबीआयने आर्थिक स्थिती अडचणीची होताच एआयडी निर्बंध लावले होते. ज्यामुळे नवीन ठेवी स्वीकारता येत नव्हत्या आणि कर्जवाटपही बंद झाले होते. त्यावर सहकार

(उर्वरीत पान २ वर)

## प्रत्येक प्रकरणात सीबीआय चौकशी आदेश देणे अयोग्य!

प्रतिनिधी @ नवी दिल्ली

न्यायालयांनी नियमितपणे सीबीआय चौकशीचे आदेश देऊ नयेत. आपले अधिकार अधिक संयम आणि सावधगिरीने वापरावेत. जेव्हा इतर सर्व पर्याय संपले असतील आणि प्रकरणाची निष्पक्षता बाधित झाली असेल, तेव्हाच सीबीआय चौकशीचा अवलंब केला पाहिजे. प्रत्येक प्रकरणात सीबीआय चौकशीचा आदेश देणे केवळ संस्थेवरील कामाचा भार वाढवत नाही, तर राज्यांच्या तपास यंत्रणांवरील विश्वासालाही धक्का देते, अशी महत्वाची टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने केली.

हा निर्णय अलाहाबाद हायकोर्टच्या आदेशावर




दिला गेला आहे. हायकोर्टने उत्तर प्रदेश विधान परिषदेत कर्मचा-यांच्या भरती प्रक्रियेत झालेल्या कथित गैरव्यवहारांच्या चौकशीसाठी सीबीआयला निर्देश दिले होते. या आदेशावर आक्षेप घेत न्यायमूर्ती जे. के. माहेश्वरी आणि न्यायमूर्ती विजय बिश्नोई यांच्या खंडपीठाने हायकोर्टचा तो निर्णय रद्द केला आणि स्पष्ट केले की, सीबीआय

(उर्वरीत पान २ वर)

## गुजरातच्या मंत्रिमंडळात नव्या चेहऱ्यांना संधी

### तरुण नेते हर्ष संघवींची उपमुख्यमंत्रीपदी वर्णी, रिवाबा जडेजानेही घेतली शपथ





प्रतिनिधी @ गांधीनगर

भाजपशासित गुजरातमध्ये गुरुवारी (दि. १६) राजकीय हालचालींना वेग आला आणि मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्या मंत्रिमंडळातील सर्व १६ मंत्र्यांनी राजीनामे सादर केले. केवळ मुख्यमंत्री पटेल यांनाच पदावर ठेवत, संपूर्ण मंत्रिमंडळ बदलण्याचा निर्णय पक्ष नेतृत्वाने घेतला.

गुजरातच्या मंत्रिमंडळात नव्या चेहऱ्यांना संधी; तरुण नेते हर्ष संघवींची उपमुख्यमंत्रीपदी वर्णी, रिवाबा जडेजानेही घेतली शपथ

भाजपशासित गुजरातमध्ये गुरुवारी (दि. १६) राजकीय हालचालींना वेग आला आणि मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्या मंत्रिमंडळातील सर्व १६ मंत्र्यांनी राजीनामे सादर केले. केवळ मुख्यमंत्री पटेल यांनाच पदावर ठेवत, संपूर्ण मंत्रिमंडळ बदलण्याचा निर्णय पक्ष नेतृत्वाने घेतला. यानंतर शुक्रवारी (दि.

(उर्वरीत पान २ वर)

### नव्या चेहऱ्यांचा समावेश

माजी मंत्री मनीषा वकील आणि दर्शना वाघेला या महिलांना मंत्रीपद मिळाले आहे. तर, काँग्रेसमधून भाजपमध्ये प्रवेश केलेले अर्जुन मोधवाडिया यांनाही मंत्रिपद देण्यात आले. तसेच, मोरबीचे आमदार कांतिभाई अमृतिया आणि माजी आयपीएस अधिकारी पीसी बरंडा यांनाही मंत्रिमंडळात स्थान मिळाले आहे. माजी भाजप अध्यक्ष जितू वाघानी यांना पुन्हा मंत्रीपद मिळाले आहे.

## राहुरीचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे निधन

प्रतिनिधी @ राहुरी



राहुरी विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे विद्यमान आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे आज अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने अहिल्यानगर जिल्ह्याच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. कर्डिले हे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संग्राम जगताप यांचे सासरे होते.

राजकारणातील दमदार आणि जमिनीशी नाळ जपणारे नेते म्हणून ओळखले जाणारे कर्डिले यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात ग्रामपातळीवर केली होती. सरपंच पदावरून त्यांनी राजकीय प्रवासाला सुरुवात केली आणि पुढे राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही सक्रिय भूमिका बजावली.

२००९ साली त्यांनी भाजपच्या तिकिटावरून प्रथमच विधानसभा निवडणूक लढवली आणि विजय मिळवला. त्यानंतर २०१४ साली पुन्हा राहुरी मतदारसंघातून विजयी होत त्यांनी सलग दुसऱ्यांदा विधानसभेत प्रवेश केला. या काळात त्यांनी मतदारसंघात विविध विकासकामे राबवली आणि स्थानिक पातळीवर मजबूत जनाधार तयार केला.

मात्र, २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्राजक्त तनपुरे यांनी कर्डिले यांना पराभूत केले आणि त्यांच्या विजयाच्या हॅटट्रिकला अडथळा आणला. मात्र, २०२४ च्या निवडणुकीत त्यांनी पुन्हा ताकदीनं पुनरागमन करत तनपुरेंना पराभूत करत विजय मिळवला. आमदार, राज्यमंत्री, अहिल्यानगर जिल्हा बँकेचे चेअरमन अशा विविध पदांवर त्यांनी कार्य केले.

राहुरी परिसरात लोकप्रिय आणि कार्यकर्त्यांमध्ये प्रेमाने 'शिवाजीराव' म्हणून ओळखले जाणारे कर्डिले यांनी साधेपणा आणि जनसंपर्कावर भर दिला होता. त्यांच्या निधनाची बातमी समजताच राहुरी आणि नगर परिसरात शोककळा पसरली आहे. राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

राहुरी विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे विद्यमान आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे आज अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने अहिल्यानगर जिल्ह्याच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. कर्डिले हे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संग्राम जगताप यांचे सासरे होते.

## जैन समाजाचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

प्रतिनिधी @ पुणे



मॉडेल कॉलनी परिसरातील पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट असलेल्या शेठ हिराचंद नेमचंद जैन दिगंबर बोर्डिंगची(जैन बोर्डिंग) जागा काही विश्वस्तांनी बेकायदेशीरपणे विकली असल्याचा आरोप करत या निर्णयाला जैन समाजाने तीव्र विरोध केला आहे. यासाठी समाजाने शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर रोजी जैन बोर्डिंग ते जिल्हाधिकारी कार्यालय असा मोर्चा काढला होता.

यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांना मागण्यांचे निवेदन दिले. मोर्चात आचार्य गुरुदेव श्री गुप्तीनंदजी महाराज, तीर्थेष ऋषिजी, माताजी महाराज हे मुनीगण होते. शेतकरी पक्षाचे नेते, राजू शेट्टी काँग्रेसचे नेते अभय छाजेड, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहाध्यक्ष प्रशांत जगताप, शिवसेना (ठाकरे गटाचे) संजय मोरे उपस्थित होते. तसेच आनंद कांकरिया, स्वप्नील गंगवाल, ॲड. योगेश पांडे, ॲड. स्वप्नील बाफना, अण्णा पाटील, चंद्रकांत पाटील, ॲड. जिंतूरकर, अक्षय जैन सहभागी झाले होते.

ही जमीन विक्री बेकायदा असून त्याविरोधात सर्वांनी एकत्रितपणे लढा द्यायचा आहे, असे आवाहन आचार्य गुरुदेव श्री गुप्तीनंदजी महाराज यांनी केले. शेठ हिराचंद नेमचंद स्मारक

(उर्वरीत पान २ वर)



## 'युनिव्हर्सल किडनी' बनविण्यात शास्त्रज्ञांना यश

प्रतिनिधी @ बीड

वैद्यकीय आणि अवयव प्रत्यारोपण क्षेत्रात एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा गाठला गेला आहे. कॅनडा आणि चीनमधील शास्त्रज्ञांच्या एका चमूने एक अशी 'युनिव्हर्सल किडनी' तयार केली आहे, जी सैद्धांतिकदृष्ट्या कोणत्याही रक्तगटाच्या रुग्णाला यशस्वीरित्या प्रत्यारोपित करता येऊ शकते. यामुळे किडनी प्रत्यारोपणासाठी प्रतीक्षा यादीत असलेल्या लाखो रुग्णांसाठी एक मोठी आणि जीवनरक्षक आशा निर्माण झाली आहे.

सध्या रुग्णाच्या रक्तगटाशी जुळणारी किडनी मिळणे आवश्यक

(उर्वरीत पान २ वर)

## संपादकीय

# धर्माच्या आडून शोषण

रत्नागिरीतील खेड तालुक्यातील ‘अध्यात्मिक वारकरी निवासी गुरुकुल’ या आश्रमात अल्पवयीन मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराने राज्य हादरले आहे. धर्माच्या नावाखाली सत्तेचा व पैशाचा खेळ करणाऱ्या तथाकथित महाराजांची ही कृत्ये समाजाच्या अधोगतीची चिन्हं आहेत.

दिल्लीतील प्रसिद्ध स्वामी चैतन्यनंद महाराजांनी आश्रमातील १७ मुलींचे लैंगिक शोषण केल्याची घटना ताजी असतानाच महाराष्ट्रातील रत्नागिरीस्थित खेडच्या एका अध्यात्मिक आश्रमात लैंगिक अत्याचाराची घटना समोर आल्याने खळबळ उडाली आहे. देवाच्या नावाने महाराजाचा वेश धारण करून ही कोकरे समाजात फिरत आहेत व धर्माच्या नावावर हिंसा पसरवून गैरकृत्य करत आहेत. धर्माचाच बुरखा पांघरून हे धर्माचे ठेकेदार आता आया-बहिणींची अब्रू लुटत आहेत हे अधिक धोकादायक आहे. धर्माच्या नावाने शोषण ही नवी गोष्ट नाही. या शोषण करणाऱ्यांना ना धर्माचे भय, ना कायद्याचा वचक ना समाजाची आणि संविधानाची चिंता. माणूस म्हणून आपण अधिक अधोगतीला चाललोय याचे हे लक्षण आहे.

काय आहे प्रकरण?

रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यात लोटे या ठिकाणी दोन वर्षांपासून ‘अध्यात्मिक वारकरी निवासी गुरुकुल’ या नावाने आश्रम सुरू केला आहे. भगवान कोकरे नामक स्वयंघोषित महाराज या आश्रमाचा प्रमुख आहे. या ठिकाणी राज्यातील गोरगरीब मुलांना व मुलींना प्रवेश देऊन त्यांना अध्यात्मिक शिक्षण दिले जाते. येथे शिक्षण घेत असलेल्या अल्पवयीन मुलीच्या विनयभंगाची व लैंगिक अत्याचाराची घटना घडली असून या प्रकरणी १३ ऑक्टोबर रोजी रात्री खेड पोलीस स्टेशन येथे पीडितेने आश्रमाचा प्रमुख भगवान कोकरे महाराज आणि शिक्षक प्रीतेश कदम या दोघांविरोधात बालकांचे लैंगिक अत्याचार संरक्षण कायद्याच्या (पोस्को) कलम १२ व १७ तसेच भारतीय नागरिक संहिता कायद्याच्या कलम ७४, ३५१ (३) आणि ८५ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी सुनावली आहे. कोकरे महाराजावर प्रचंड मोठा राजकीय वरदहस्त असतानाही पोलिसांनी गुन्हा दाखल करून तत्काळ अटक केल्याने या घटनेचे गांभीर्य लक्षात येते. या घटनेमुळे कोकणात खळबळ उडाली आहे.

कोण आहे कोकरे महाराज?

स्वयंघोषित भगवान कोकरे महाराज यांनी काही वर्षांपूर्वी रत्नागिरीतील लोटे गावात ‘श्री संत ज्ञानेश्वर माऊली जीवन मुक्ती धाम सेवा संस्थान’ नावाने गोशाळा सुरू केली आहे. शेकडो भाकड जनावरे या गोशाळेत असून, या गोशाळेसाठी मोठ्या देणग्या महाराज गोळा करतात; मात्र या गाईंची योग्य ती काळजी घेतली जात नाही, असा आरोप केला जातो. तसेच लोटे एमआयडीसीमध्ये बेकायदेशीररीत्या जागा ताब्यात घेऊन गोशाळा व आश्रम चालवतात, असा स्थानिकांचा आरोप आहे. एप्रिल २०२३ साली गोशाळेच्या अनुदानासाठी व जागेच्या मागणीसाठी या कोकरे महाराजांनी १० दिवस उपोषण केले होते. राजकीय स्टंटबाजीने हे उपोषण माध्यमांमध्ये चमकले होते. सध्याच्या काळात गोशाळा चालविणे हा एक मोठा धनप्राप्तीचा व्यवसाय झाला आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र वारकरी महामंडळाच्या कोकण प्रांताचेही प्रमुख आहेत. अनेक हिंदुत्ववादी संस्थांच्या-पक्षांच्या जवळचे असून, कीर्तनाच्या व वारकरी संप्रदायाच्या आडून हिंदुत्ववादाचा जोरदार पुरस्कार, आरक्षणाला विरोध आणि समान नागरी कायदा लागू व्हावा म्हणून ते प्रचार-प्रसार करत असतात. धर्माच्या आडून राजकीय वरदहस्ताने या महाराजांनी रत्नागिरीसह कोकणात चांगलाच जम बसवला होता. विविध राजकीय पक्षांना, नेत्यांना ललकारण्यापर्यंत त्यांची मजल गेली होती. यावरून त्यांच्या धार्मिक ताकदीचा अंदाज येतो.




# नगरपरिषदेचे अध्यक्षपद नव्या महिला नेतृत्वाला संधी आणि ५० टक्के प्रतिनिधित्व तरुणांना संधी दिले जाईल. डॉ.योगेश क्षिरसागर

बीड (प्रतिनिधी) नगरपरिषदेचे अध्यक्षपद अनुसूचित जातीतील महिलेसाठी आरक्षित असल्याने आता नव्या महिला नेतृत्वाला संधी मिळणार आहे. ज्यांना पूर्वी संधी मिळाली नाही, त्यांचाही विचार केला जाईल. तसेच, ५० टक्के प्रतिनिधित्व तरुणांना दिले जाईल. गेली ३० वर्ष बीडकरांनी डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवला आहे. ही विजयाची परंपरा पुढेही कायम राहणार आहे, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केला आहे.

आगामी नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या उपस्थितीत बीडमध्ये सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या सभागृहात गुरुवारी (दि.१६) बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते.

यावेळी डॉ.सारिकाताई क्षीरसागर, माजी नगरसेवक किशोर काळे, गणेश वाघमारे, भास्कर जाधव, नरसिंग नाईकवाडे, शिवाजी जाधव, संजय होळकर, शुभम धूत, अशोक वाघमारे, विकास जोगदंड, प्रकाश कानगावकर, प्रेम चांदणे, रवी जवेरी, राहुल गुरखुदे, बाळासाहेब जाधव, सुभाष सपकाळ, संगीता वाघमारे, शालिनी परदेशी, मुस्तफा भाई, नशीर अन्सारी, बाळासाहेब आंबेकर, महेश गर्जे, अमोल पवळ, साउद भाई, सतीश पवार, नबील जमा, बाळासाहेब गुंजाळ, दत्ता जाधव, संभाजी दुधाळ, रवींद्र कदम, जुनेद जहागिरदार, अशोक शेजवळ, बाबू अत्तार, मुजीब एवन, गुड्डू चाऊस, बिलाल, असरार, पिंटू माने, खमर, द्वारकादास फटाले यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, नगरपरिषद निवडणूक ही आपल्यासाठी नवी नाही. परिस्थिती काहीही असो, शहरातील जनता आपल्या सोबत उभी आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार हे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या बीड नगरपरिषद निवडणुकीत मी माझ्या विधानसभा निवडणुकीपेक्षा अधिक ताकद लावणार आहे. कायम निष्ठेने सोबत असलेल्या कार्यकर्त्यांनाच पक्षाकडून संधी दिली जाणार आहे. परंतु आपण उभे केलेले काही लोक आज पक्षातील नेत्यांकडेच आपली तक्रार करत आहेत, ही खेदजनक बाब आहे. प्रत्येकाने आपापले घर मजबूत करावे, इतरांकडे पाहू नये. ज्यांना आजपर्यंत स्वतःची नगरपरिषद ताब्यात घेता आली नाही, ते बीडमध्ये येऊन काय करणार? असा टोला त्यांनी लगावला. ते पुढे म्हणाले, नव्या-जुन्या कार्यकर्त्यांची सांगड घालून आपण निवडणुकीला सामोरे जाणार आहोत. अजितदादांनी बीड शहरासाठी सर्वाधिक निधी दिला आहे. सीट्रिपलआयटी, शासकीय इमारती, नदी सुशोभीकरण, डीपी रस्ते यांसारखे महत्वाचे विकास प्रकल्प हाती घेतले आहेत. अनेक



प्रस्तावांवर बसून चर्चा करून निधी मिळवला, परंतु त्याचे श्रेय आमदार घेत आहेत. आमदारांचा फंड नेमका कुठे गेला याबाबत मात्र कोणी बोलत नाही. माजी आमदारांच्या कामांचे बोर्ड दिसतात; मात्र निधी कोणत्या कामावर खर्च झाला याचा हिशोब कोणी देत नाही, असेही त्यांनी नमूद केले. बीडच्या विकासासाठी नगरपरिषद निवडणूक आपल्या ताब्यात येणे आवश्यक आहे. गेल्या तीन ते साडेतीन दशकांत मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे. मात्र लोकसंख्या व क्षेत्रफळ वाढल्याने शहराच्या हद्दीबाहेरील भागात विकासकामे अद्याप अपूर्ण आहेत, असेही ते म्हणाले. या बैठकीत अनेकांनी मनोगत व्यक्त केले. तसेच, आगामी निवडणुकीची रणनीती, संभाव्य उमेदवारांबाबत प्राथमिक चर्चा झाली. नगरपरिषद निवडणूक नियोजनबद्ध पद्धतीने लढविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यकर्त्यांसाठी पूर्ण ताकदीने निवडणूक लढविणार : डॉ.सारिकाताई क्षीरसागर

डॉ.सारिकाताई क्षीरसागर मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या, डॉ.योगेश क्षीरसागर हे सर्वसमावेशक नेतृत्व आहे. त्यांचा शांत स्वभाव आहे, याचा अर्थ आम्ही कमजोर नाहीत. डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांनी बीड शहराचा विकास केला आहे. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून डॉ.योगेश हे राजकारणात पुढे जात आहेत.

# बीड पंचायत समिती कार्यालयाकडून महिलांच्या स्वच्छतागृहाला कुलूप

## पाणी नसल्याचे कारण देत प्रशासनाची टाळाटाळ; स्वच्छ भारत मिशनला हरताळ; पंचायत समितीला कुलूप ठोकण्याचा इशारा

- डॉ. गणेश ढवळे

बीड : बीड पंचायत समिती कार्यालयात कामानिमित्त येणाऱ्या महिला अभ्यागतांसह कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यांसाठी असलेले स्वच्छतागृह ‘पाणी नाही’ या कारणावरून बंद ठेवण्यात आले आहे. विशेष म्हणजे, प्रशासनाने या समस्येवर उपाययोजना करण्याऐवजी बाहेरील शौचालय वापरा अशी लाजिरवाणी सूचना प्रवेशद्वारावर लावून जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न केला आहे.

गटविकास अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार लावण्यात आलेल्या नोटीसमध्ये म्हटले आहे की, पाणीपुरवठा सुरळीत नसल्यामुळे स्वच्छतागृहात दुर्गंधी येत असल्याने कार्यालयात आलेल्या अभ्यागतांनी बाहेरील स्वच्छतागृह वापरावे.

ग्रामीण भागातून कार्यालयात येणाऱ्या महिलांसाठी बाहेर शौचालय शोधणे हे अत्यंत गैरसोयीचे असून सुरक्षेच्या दृष्टीने चिंताजनक आहे. तसेच कार्यालयात कार्यरत महिला कर्मचाऱ्यांना यामुळे मोठी अडचण भासत आहे.

महिलांच्या आरोग्याच्या आणि गोपनीयतेच्या दृष्टीने स्वच्छतागृह ही मूलभूत गरज असून शासकीय कार्यालयांनी ती सुविधा कायम ठेवणे बंधनकारक आहे. पाणीपुरवठा नसल्यानं सुविधा बंद ठेवणे ही प्रशासनाची अनास्था असल्याचे स्पष्ट दिसते. पाणीपुरवठा सुरळीत करणे, स्वच्छता राखणे आणि दुर्गंधी दूर करणे ही प्रशासनाची जबाबदारी असताना, नागरिकांना गैरसोयीच्या स्थितीत ठेवणे अमान्य आहे.



एकीकडे शासन स्वच्छ भारत मिशनच्या घोषणा करते, कोट्यवधी रुपयांचा निधी वापरते; तर दुसरीकडे महिलांसाठी असलेले शासकीय स्वच्छतागृह बंद ठेवले जात आहे - ही बाब स्वच्छ भारत योजनेला हरताळ फासणारी आहे.

या पार्श्वभूमीवर, सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी दि. २० ऑक्टोबर, सोमवार रोजी पंचायत समिती कार्यालयाला कुलूप ठोकण्याचा इशारा देत प्रशासनाला लेखी निवेदन दिले आहे.

तसेच, या प्रकरणी लाडक्या बहिणींची हेळसांड करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी करत बीड जिल्ह्याचे पालकमंत्री मा. अजित पवार यांना लेखी तक्रार सादर करण्यात आली आहे.

पान १ वरून...

**विखे आला....**

पक्षाच्या दावणीला बांधलो नाही. इथं फक्त ओबीसीसाठी लढा देत आहोत. पक्षाच काम आल्यावर आम्ही त्यासाठी लढू असे भुजबळ म्हणाले. जे जे ओबीसीच्या मुळावर उठले असतील त्यांना आडवे करा असा इशारा भुजबळ यांनी दिला.

मराठा आणि कुणबी या दोन वेगळ्या जाती

मराठा आणि कुणबी या दोन वेगळ्या जाती आहेत, हा निर्णय उच्च न्यायालयानं दिला आहे, सर्वोच्च न्यायालयाने देखील सांगितलं आहे की, मराठा समाज हा सामाजिकदृष्टया मागास नाही असे भुजबळ म्हणाले. भाजपच्या सगळ्या नेत्यांना सांगतोय, ओबीसीच्या ताकतीवर तुम्हाला १४५ आमदार मिळाले आहेत. त्यामुळं यावर मार्ग काढा असे भुजबळ म्हणाले.

**राज्यातील १४३...**

आयुक्तालयाने अशा निर्बंध लावलेल्या बँकांवर विशेष लक्ष केंद्रित करीत बैठका घेतल्या.

कर्जाची वसुली करणे आणि नव्याने सभासद करून भागभांडवल गोळा करणे यासाठी सहकार उपनिबंधकांवर पालक अधिकारी म्हणून जबाबदारी टाकली. त्याचा वेळोवेळी आढावा घेण्यात येऊन संबंधित बँकांचे पदाधिकारी, संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना टीमवर्क म्हणून काम करण्यासाठी सहकार विभागाने मार्गदर्शकाची आणि सहकार्याची भूमिका घेतली.

**यंदा काळी ....**

१० तारखेला काढलेल्या दुस-या जीआरमध्ये या सवलतींचा उल्लेखच वगळण्यात आला. त्यामुळे लोकांपुढे एक वेगळे मांडायचे आणि शेतक-यांची फसवणूक करायची. दुसरीकडे वस्तूस्थिती वेगळी असायची, हे या सरकारचे धोरण आहे असा आरोप विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

सोयाबीनला बेभाव, कापसाला कमी दर

अतिवृष्टीग्रस्त शेतक-यांसाठी केंद्राकडे एनडीआरएफच्या मदतीचा प्रस्ताव अद्यापही पाठवण्यात आलेला नाही. तसेच, कापूस खरेदी केंद्रांना अजून सरकारने परवानगी दिली नाही. ओलावा कमी करण्याच्या नियमांमुळे महाराष्ट्रातील कापूस व्यापारी कमी दरात खरेदी करतील. परिणामी, शेतक-याला ४-४.५ हजार रुपयांत कापूस विकावा लागेल आणि तो उद्ध्वस्त होईल. सोयाबीनलाही योग्य भाव मिळत नाही असेही वडेट्टीवार म्हणाले. शेतक-यांना दिवाळीपूर्वी मदत देऊ असे सांगण्यात आले होते. पण शेतक-यांच्या खात्यात पैसे वळते झालेले दिसत नाहीत. थोडी तरी जनाची नाही तर मनाची लाज वाटत असेल तर शेतक-यांचा छळ करू नये, असा खोचक टोला वडेट्टीवारांनी लगावला.

**जैन समाजाचा....**

ट्रस्टच्या ताब्यातील भूखंडाबाबत काही व्यक्तींमार्फत विकासकांशी व्यवहार करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. हा विक्रीकरार आणि त्यानंतरचा कर्जकरार रद्द करावा आणि वसतिगृहाची मालमत्ता वसतिगृह आणि ट्रस्टच्या संबंधित धर्मादाय कारणांसाठीच वापरली जावी, अशी समाजाची मागणी आहे.

यावेळी शेट्टी म्हणाले अल्पसंख्याक समाज असल्याने त्यांच्यावर काही अन्याय केला, त्यांच्या मालमत्ता हडप केली तरी कोणी विचारणार नाही असा समज आहे. काही ट्रस्टना

पान १ वरून...

बंदुकीचा धाक दाखवला असेल. ईडीची भीती दाखवली असेल त्यामुळे त्यांनी जागा विकासकाला देण्याची तयारी दाखवली असेल.

याप्रकरणी लक्ष्मीकांत खाबिया, अॅड. योगेश पांडे आणि आनंद कांकरिया यांनी गुरुवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पुण्यात भेट घेतली. मुख्यमंत्र्यांनी त्यांनी शिष्टमंडळाला वसतिगृह आणि मंदिराविषयी समाजावर अन्याय होणार नाही, अशी ग्वाही दिली आणि सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले असे खाबिया यांनी सांगितले.

**प्रत्येक प्रकरणात ...**

चौकशीचा आदेश सहजासहजी देता येत नाही.

न्यायालयाने आपल्या निर्णयात म्हटले की, सीबीआय चौकशीचा आदेश सामान्यत: देऊ नये किंवा केवळ यासाठी देऊ नये की, कोणत्या तरी पक्षाने एखाद्या राज्यातील पोलिसांवर अविश्वास दाखवला आहे. सीबीआय चौकशीचा आदेश देण्याचा अधिकार संयमाने, सावधगिरीने आणि केवळ अपवादात्मक परिस्थितीत वापरला पाहिजे. संबंधित न्यायालयाला खात्री पटली पाहिजे की, संबंधित प्रकरणात सीबीआय तपास आवश्यक आहे, किंवा प्रकरण इतके गुंतागुंतीचे, व्यापक किंवा राष्ट्रीय प्रभावाचे आहे की, केंद्रीय एजन्सीची गरज भासते. केवळ अशा परिस्थितीतच सीबीआय चौकशीचे आदेश द्या.

**गुजरातच्या मंत्रिमंडळात....**

१७) गांधीनगर येथील महात्मा मंदिरात नव्या मंत्रिमंडळाचा भव्य शपथविधी सोहळा पार पडला. राज्यातील तरुण नेत्यांपैकी एक असलेले हर्ष संघवी यांची उपमुख्यमंत्री पदी वर्णी लागली आहे.

राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या उपस्थितीत एकूण २५ मंत्र्यांनी शपथ घेतली. या नव्या मंत्रिमंडळात १८ नवीन सदस्यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात नवे चेहरे दिसले. टीम इंडियाचा क्रिकेटपटू रवींद्र जडेजाची पत्नी रिवाबा जडेजानेही मंत्रिपदाची शपथ घेतली. यावेळी स्वतः रवींद्र जडेजा उपस्थित होता.

**‘युनिव्हर्सल किडनी’ ...**

असते, ज्यामुळे ‘ओ’ रक्तगटाच्या रुग्णांना सर्वाधिक काळ प्रतीक्षा करावी लागते. अमेरिकेमध्ये दररोज सरासरी ११ लोक किडनी न मिळाल्याने मृत्यूमुखी पडतात आणि यातील बहुतांश रुग्ण ‘ओ’ रक्तगटासाठी प्रतीक्षा करत असतात.

युनिव्हर्सल किडनी तयार करण्याच्या या प्रक्रियेत, शास्त्रज्ञांनी ‘ए’ रक्तगटाची किडनी घेऊन तिचे ‘ओ’ रक्तगटाच्या किडनीमध्ये रूपांतर केले. यासाठी त्यांनी काही विशेष एन्झाईमचा वापर केला. या एन्झाईमचे कार्य शास्त्रज्ञांनी ‘मॉलिक्युलर कात्री’ प्रमाणे असल्याचे सांगितले आहे.


हे जे एन्झाईम आहेत ते रक्तगटाची ओळख दर्शवणारे साखरेचे रेणू काढून टाकतात. युनिव्हर्सल किडनी तयार झाल्यावर, रक्तगट ‘ओ’ प्रमाणे ती ‘एबीओ अँटिजेन-मुक्त’ होते. शास्त्रज्ञांच्या मते, हे एखाद्या गाडीचा लाल रंग काढून आतला न्यूट्रल प्राइमर उघड करण्यासारखे आहे. एकदा हे झाल्यावर, रोगप्रतिकारशक्तीला तो अवयव परका वाटत नाही.

मात्र, तीन दिवसांनंतर किडनीवर पुन्हा ‘ए’ रक्तगटाचे काही अंश दिसू लागले, ज्यामुळे शरीराच्या रोगप्रतिकारशक्तीने प्रतिक्रिया दिली. परंतु ही प्रतिक्रिया सामान्य प्रत्यारोपणात होणा-या प्रतिक्रियेपेक्षा खूपच कमी आणि सौम्य होती. शास्त्रज्ञांनी स्पष्ट केले आहे की, हे संशोधन मोठे असले तरी, जिवंत व्यक्तींवर चाचण्या सुरू करण्यापूर्वी अजूनही काही आव्हानांवर मात करणे आवश्यक आहे. हे महत्त्वपूर्ण संशोधन ‘नेचर बायोमेडिकल इंजिनिअरिंग’ या प्रतिष्ठित जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहे.

# शेतकरी बांधवांनी शेतमाल तारण कर्ज योजनेचा लाभ घ्यावा. – ज्ञानेश्वर (डी. के ) जगताप

निफाड : रामभाऊ आवारे
(दै महाभारत)

खरीप हंगामातील मका, सोयाबीन, तुर, मुग, उडीद, बाजरी व करडई काढणीचे काम सुरू झाले असुन शेतकरी बांधवांचा सदर शेतीमाल एकाचवेळी बाजार आवारावर विक्रीस येत असल्यामुळे बाजारभाव कमी होऊन शेतक-यांचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणुन लासलगांव बाजार समितीने दरवर्षीप्रमाणे सन २०२५-२६ या हंगामाकरीता शेतमाल तारण कर्ज योजना सुरू करण्याचा महत्वपुर्ण निर्णय घेतला असल्याची माहिती बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर (डी. के.) जगताप यांनी दिली.



महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे या संस्थेमार्फत सन १९९०-९१ पासुन राबविण्यात येणा-या या योजनेंतर्गत बाजार समिती सन २०२५-२६ या हंगामाकरीता मका, सोयाबीन, तुर, मुग, उडीद, ज्वारी, बाजरी व करडई या प्रमुख शेतीमालासाठी तारण कर्ज योजना राबविणार आहे. त्यानुसार या योजनेंतर्गत फक्त उत्पादक शेतक-यांचाच माल तारणात ठेवला जाणार आहे. शासकीय प्रतवारीकार व बाजार समितीचे प्रतवारीकार यांनी संयुक्तरित्या शिफारस केलेला मका, सोयाबीन, तुर, मुग, उडीद, ज्वारी, बाजरी व करडई हा शेतीमाल ज्या दिवशी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या गोदामात तारण म्हणुन ठेवला जाईल. त्या दिवसाचे सरासरी बाजारभाव किंवा त्या मालाचे किमान आधारभुत दर यापैकी जे कमी असेल ते विचारात घेऊन बाजार समिती वखार महामंडळाचे पावतीप्रमाणे स्वनिधीतुन संबंधित शेतक-यास धनादेशाद्वारे रक्कम अदा करणार आहे. संबंधित शेतक-यांचा खाते उतारा व ७/१२ उता-यावरील लागवड क्षेत्र व उत्पादीत माल याचे प्रमाण ठरवुन एकुण किंमतीच्या ७५ टक्के रक्कम तारण कर्ज म्हणुन ०६ महिन्यांचे मुदतीने ०६ टक्के व्याजदराने शेतक-यांना अदा करण्यात येणार आहे. त्यानंतरच्या ०६ महिन्यांकरीता ०८ टक्के व त्यापुढील ०६ महिन्यांकरीता १२ टक्के व्याज दराने आकारणी केली जाणार आहे. १८ महिन्यांनंतर सदर कर्जास मुदतवाढ मिळणार नाही.तरी शेतकरी बांधवांनी सदर योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. तसेच सदर योजनेच्या अधिक माहितीसाठी बाजार समितीच्या लासलगांव मुख्य कार्यालयात अथवा ९९२१४२३५३६ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर (डी.के)जगताप, उपसभापती संदीप (ललीत) दरेकर व सचिव नरेंद्र वाढवणे यांनी केले आहे.

## महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी प्रो. डॉ. तात्याराम सोंडगे यांची निवड




गेवराई (प्रतिनिधी)

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे महिला महाविद्यालय, गेवराई च्या प्राचार्य पदी प्रो. डॉ. तात्याराम सोंडेगे यांची निवड करण्यात आली. प्रो. डॉ. तात्याराम सोंडगे हे स्वा. सावरकर महाविद्यालय, बीड येथे समाजशास्त्र विषयाचे प्राध्यापक म्हणून काम करत होते. सक्षम निवड समिती मार्फत त्यांची प्राचार्य पदी निवड करण्यात आली. आज ते महाविद्यालयात प्राचार्य पदी रुजू झाले. यावेळी बोलताना ते म्हणाले की, माजी राज्यमंत्री आदरणीय शिवाजीराव (दादा) पंडित यांनी स्थापन केलेल्या 'जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ' सारख्या नावाजलेल्या संस्थेमध्ये काम करण्याची संधी मिळाली हे मी माझे भाग्य समजतो. तसेच संस्थेचे अध्यक्ष मा. आ. अमरसिंह पंडित व सचिव मा. जयसिंग पंडित यांनी माझ्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरवील. नवीन शैक्षणिक धोरणात विद्यार्थी हीत डोळ्यासमोर ठेऊन महाविद्यालयाच्या विकासासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी बोलताना सह प्रशासन अधिकारी प्रा. काशिनाथ गोगुले म्हणाले की, नवीन प्राचार्यांनी बदलत्या काळानुसार महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवावा. त्यासाठी संस्था नेहमीच सहकार्य करते. संस्था सदैव चांगले काम करणाऱ्याच्या पाठीशी उभी राहते. त्यांच्या निवडीबद्दल आ. विजयसिंह पंडित, मा. रणवीर पंडित, मा. पृथ्वीराज पंडित, प्रशासन अधिकारी श्री. प्रमोद गोरकर यांनी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी संस्थेचे सह प्रशासन अधिकारी प्रा. काशिनाथ गोगुले, लेखापाल श्री. प्रतापराव हाटोटे, प्रभारी प्राचार्य डॉ. राजाभाऊ चव्हाण, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## कै.गंगाधर डाके यांच्या स्मृतिप्रित्यर्थ मोफत आरोग्य तपासणी शिबीर

माजलगाव : (प्रतिनिधी ) तालुक्यातील डाके पिंपरी येथील प्रतिष्ठीत नागरिक कै. गंगाधर श्रीरंगराव डाके यांना दि. ५/१०/२०२५ रोजी देवाज्ञा झाली. त्यांच्या गंगापुजनाच्या कार्यक्रमानिमीत्त दि. १८ ऑक्टोबर रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.



तालुक्यातील डाके पिंपरी येथील गंगाधर डाके हे प्रगतशील शेतकरी म्हणुन सर्वपरिचीत होते तर मनमिळावु स्वभाव आणि सर्वांना मदतीसाठी नेहमीच पुढे असत. दि. ५ ऑक्टोबरला त्यांना देवज्ञा झाली असुन त्यांच्या गंगापुजनाच्या कार्यक्रमानिमीत्त डाके पिंपरी येथे दि. १८ ऑक्टोबरला सकाळी ९ ते दु. २ पर्यंत आरोग्य तपासणी करण्यात येणार असुन -हदयरोग तज्ञ डॉ. राधाकिसन डाके, कान - नाक - घसा व कॅन्सर तज्ञ डॉ. लक्ष्मीकांत यादव, आनंदऋषीजी नेत्रालय अहिल्यानगर येथील डोळ्यांचे तज्ञ, हाडांचे तज्ञ डॉ. अजयसिंह डाके हे तपासणी करणार आहेत. डाके पिंपरीसह पंचक्रोषीतील गरजु रूग्णांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन गोपाळ गंगाधर डाके, दिपक गंगाधर डाके यांचे वतीने करण्यात आले आहे.

## शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी वाल्मिकराव शिरसाठ आक्रमक

### गंगापूर बाजार समितीत गैरव्यवहारांवर संतप्त चर्चा; आठ दिवसांत कार्यवाहीचे आश्वासन

खुलताबाद : बाबासाहेब दांडगे
(दै. महाभारत)



शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी आवाज उठवत, गंगापूर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात गुरुवारी (दि.१६) झालेल्या बैठकीत शेतकरी नेते वाल्मिकराव शिरसाठ यांनी थेट बाजार समिती प्रशासनाला धारेवर धरले. शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर भरभरून चर्चा झाली. शेतमाल विक्री प्रक्रियेत सुरू असलेल्या गैरप्रकारांबद्दल शेतकऱ्यांचा संताप बैठकीत उफाळून आला.

शेतकऱ्यांनी स्पष्ट शब्दांत मांडले की – कांदा लिलावात ठरलेला दर देण्यास व्यापारी नकार देतात, लिलावानंतर शेडवर गेल्यावर भाव कमी करून देतात, मका खरेदीदरम्यान प्रति क्विंटल दोन किलो बेकायदेशीर कटता काढली जाते, आणि खरेदी केलेल्या मालाचे पेमेंट आठ दिवसांपर्यंत दिले जात नाही. शेतकऱ्यांच्या या जिव्हाळ्याच्या तक्रारींवर सभागृहात काही काळ तापलेले वातावरण निर्माण झाले.वाल्मिकराव शिरसाठ यांनी यावेळी बाजार समिती अधिकाऱ्यांना सुनावत म्हणाले,शेतकऱ्यांचा घाम गाळून पिकवलेला माल आहे, त्याची किंमत कमी करणे म्हणजे शेतकऱ्यांचा अपमान आहे. हे अन्याय्य प्रकार आम्ही सहन करणार नाही.

शेतकऱ्यांनी मका खरेदीचा मुक्त लिलाव तात्काळ सुरू करावा, मार्गदर्शक फलक व जबाबदार अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक प्रत्येक आडत दुकानावर लावावेत, तसेच विनापरवाना शेतमाल खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशा ठोस मागण्या बैठकीत मांडल्या.बैठकीस सहकार व पणन विभागाच्या वतीने सहाय्यक निबंधक कार्यालयाचे प्रतिनिधी श्री. शेख तसेच बाजार समितीचे सचिव श्री. मनीष गजभिये उपस्थित होते. चर्चेअंती सचिव श्री. गजभिये यांनी शेतकऱ्यांच्या सर्व मागण्यांवर आठ दिवसांच्या आत ठोस कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.या बैठकीस कांदा उत्पादक शेतकरी नेते अनंता भडके, ऋषिकेश मनाळ, नईम पटेल, सतीश भडके, आयुब शेख, जनार्दन भडके, तेजस फाळके, काकासाहेब जाधव, प्रल्हाद भडके, महेश बनसोडे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.बैठकीच्या शेवटी उपस्थित शेतकऱ्यांनी स्पष्ट इशारा दिला की – आठ दिवसांत ठोस निर्णय न घेतल्यास शेतकरी पुन्हा आंदोलनाच्या मार्गावर उतरतील.

### रमेशराव आडसकर यांचा सादोळा–आनेगाव दौरा

## मच्छीमार आणि शेतकऱ्यांच्या समस्यांकडे तात्काळ दखल घेऊन अडचणी लावल्या मार्गी

केज : प्रदिप गायकवाड
( दै. महाभारत )

जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर राहणारे मा. रमेशराव आडसकर साहेब यांनी सादोळा आणि आनेगाव या गावांचा दौरा करून स्थानिक शेतकरी, मच्छीमार आणि नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या. त्यांनी नागरिकांच्या समस्या गांभीर्याने ऐकून घेत जागेवरूनच संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून तत्काळ निर्देश दिले.

सादोळा येथे मांजरा धरण परिसरात मच्छीमारी व्यवसाय करणाऱ्या नागरिकांनी पाण्याची पातळी, परवानगी प्रक्रिया, साधन सामग्रीची कमतरता आणि विक्रीतील अडचणी अशा विविध प्रश्नांची मांडणी केली. या समस्या ऐकल्यानंतर मा.आडसकर साहेबांनी जागेवरूनच संबंधित अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवर चर्चा करून त्वरित उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. अधिकाऱ्यांनी देखील दोन दिवसांच्या आत समस्या सोडविण्याचे आश्वासन नागरिकांना दिले, ज्यामुळे मच्छीमार वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले.



यानंतर मा. आडसकर साहेब आनेगाव येथे पोहोचले. तेथे त्यांनी शेतकरी व ग्रामस्थांशी संवाद साधत शेती, पाणीटंचाई, वीजपुरवठा, खतांची उपलब्धता आणि शेती उत्पादनाचे दर या मुद्यांवर चर्चा केली. शेतकऱ्यांनी व्यक्त केलेल्या अडचणी ऐकून घेत साहेबांनी सांगितले की, पद असो वा नसो, जनसेवा हीच माझी प्राथमिकता आहे. शेतकऱ्यांच्या व नागरिकांच्या प्रश्नांवर तातडीने तोडगा काढण्यासाठी प्रयत्न सुरू राहतील.

या दौऱ्यादरम्यान ग्रामस्थांनी आडसकर साहेबांचे हार्दिक स्वागत केले. त्यांच्या जनसंपर्क व लोकाभिमुख कार्यपद्धतीबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.या भेटीदरम्यान राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शिवदास थळकरी, माजी सरपंच बाळासाहेब नांदे, माजी चेअरमन शंकरराव इंगळे, आप्पासाहेब मोरे, शोकत शेख, श्रीराम इंगळे यांच्यासह भागातील प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.या दौऱ्यामुळे सादोळा आणि आनेगाव परिसरात विकासाबाबत आशावाद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## आरोग्य कर्मचारी महासंघाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी अशोक ठोसर तर उपाध्यक्षपदी करणकुमार जोगदंड यांची निवड



बीड (दै.महाभारत)

आरोग्य कर्मचारी महासंघाच्या जिल्हाध्यक्षपदी अशोक ठोसर तर उपाध्यक्षपदी करणकुमार जोगदंड यांची निवड करण्यात आली.आरोग्य कर्मचारी महासंघाचे राज्याध्यक्ष विजय मोहरकर आणि राज्यउपाध्यक्ष शेळके व बाबासाहेब राख यांच्या विशेष उपस्थितीत आरोग्य कर्मचारी महासंघ बीड जिल्हा कार्यकारिणीची निवड करण्यासाठी बैठक घेण्यात आली. यात जिल्हाध्यक्षपदी अशोक रामनाथ ठोसर यांची तर जिल्हा उपाध्यक्षपदी करणकुमार जोगदंड यांची सर्वांमध्ये निवड जाहीर करण्यात आली. यावेळी जिल्हा हिवताप अधिकारी विजयसिंह शिंदे, सुनिल गायकवाड, जीवन सानप, एस. पी कुलकर्णी, सुधाकर कुलकर्णी, राजेश कोलुगडे यांनी उपस्थित राहून नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. संघटनेच्या कामाला गती देण्यासाठी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रश्न प्रभावीपणे मांडण्यासाठी ही निवड महत्त्वाची ठरणार आहे. नवनियुक्त जिल्हाध्यक्ष अशोक ठोसर यांनी कर्मचाऱ्यांच्या हितासाठी महासंघ कटीबद्ध राहील असे आश्वासन दिले याप्रसंगी महासंघाचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

## पूरग्रस्त सांडस चिंचोली गावात विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

माजलगाव : अमर साळवे
( दै. महाभारत )

अतिवृष्टीमुळे पूरग्रस्त ठरलेल्या सांडस चिंचोली गावातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना ग्रामपंचायत सदस्य भिम दशरथ थोरात यांनी शैक्षणिक साहित्य वाटप केले.काही दिवसांपूर्वी आलेल्या पुरामुळे गावाचा संपर्क तुटला होता, अनेक घरांत पाणी शिरले होते, आणि नागरिकांना भयानक पूरपरिस्थितीला सामोरे जावे लागले. या संकटाच्या काळात अनेक दानशूर व्यक्तींनी सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीचे दर्शन घडवत पूरग्रस्तांना मदतीचा हात दिला.



त्याच पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी एक छोटा पण अर्थपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. भिम दशरथ थोरात सर, बंडू पवार सर, आणि सुखदेव माने सर यांनी ही फुलं न फुलाची पाकळी म्हणून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केले.कार्यक्रमावेळी शाळेचे मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मनपूर्वक अभ्यास करण्याचे आवाहन करत आगामी दिपावलीच्या शुभेच्छाही देण्यात आल्या.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलले आणि पूरानंतरच्या काळोखात आशेचा दिवा प्रज्वलित झाला.

## पोलिस पाटील रमेश ढिवरे यांची जिल्हा समन्वयक पदी नियुक्ती

खुलताबाद : बाबासाहेब दांडगे
(दै. महाभारत)

खुलताबाद तालुक्यातील वेरूळ येथील पोलिस पाटील रमेश गंगाधर ढिवरे यांची गाव कामगार पोलिस पाटील संघटनेच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हा समन्वयक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.संघटनेचे राज्याध्यक्ष शिवाजी कोलते पाटील यांच्या आदेशानुसार ही महत्त्वाची जबाबदारी ढिवरे यांच्यावर सोपविण्यात आली आहे.ढिवरे हे गेल्या अनेक वर्षांपासून पोलिस पाटील म्हणून प्रामाणिकपणे आणि तत्परतेने कार्य करत असून ग्रामस्तरावर कायदा-सुव्यवस्था राखण्यात त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांच्या कार्यतत्परतेचा आणि संघटनात्मक नेतृत्वगुणांचा गौरव म्हणूनच त्यांची जिल्हा समन्वयक पदासाठी निवड झाल्याचे संघटनेतून सांगण्यात आले.या नियुक्तीबद्दल संघटनेचे जिल्हाध्यक्ष कारभारी निघोटे, उपाध्यक्ष अरुण बोडके, सचिव महादेव भालेराव तसेच कार्यकारिणी सदस्यांनी रमेश ढिवरे यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.या नियुक्तीमुळे खुलताबाद



तालुक्यातील पोलिस पाटील वर्गात आनंदाचे वातावरण असून, वेरूळ ग्रामस्थांनीही ढिवरे यांच्या निवडीचे स्वागत केले आहे.

## अखेरीस संगमनेर ते सप्तश्रृंगी गड बस फेरी सुरू

निफाड ।रामभाऊ आवारे
(दै महाभारत)

शारदीय नवरात्रोत्सव दरम्यान संगमनेर ते सप्तश्रृंगी गड बस सुरू करावी अशी मागणी सातत्याने केली जात होती. आता ही बससेवा सुरू होत असल्याने ह्या मार्गावरील प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे. सकाळी ६:३० वाजता संगमनेरहुन ही बस सुरू होईल त्यानंतर नांदूर शिंगोटे, मऱ्हळ, पांगरी, पंचाळे, सोमठाणे, खेडलेझुंगे, विंचूर, लासलगाव, चांदवड, देवळा, कळवण, नांदुरी, सप्तश्रृंगी गड ह्या मार्गे ही बस सुरू राहील. त्यानंतर दुपारी २.२० वाजता त्याच मार्गे फेरा मारून संगमनेर येथे मुक्कामी जाईल.ही बस फेरी सुरू व्हावी यासाठी क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे, खासदार राजाभाऊ वाजे, आमदार सत्यजित तांबे इ. लोकप्रतिनिधी यांनी पत्रव्यवहार केला. सदरची मागणी आणि पाठपुरावा पांगरी गावचे सरपंच ज्ञानेश्वर पांगारकर, पंचाळेचे सरपंच महेश थोरात, संदीप पगार, आत्माराम पगार, सिराज कादरी यांनी सातत्याने केली. दरम्यानच्या काळात पांगारकर आणि थोरात यांनी पांगरी, पंचाळे, मऱ्हळ, सोमठाणे, श्रीरामपूर, पिंपळगाव, धारणगाव वीर, देवपूर इ. गावांचे मागणी पत्र आणि प्रस्ताव जमा करून विभाग नियंत्रक नाशिक आणि आगर प्रमुख कळवण यांना सादर केले. ही बससेवा सुरू झाल्याबद्दल ह्या मार्गावरील प्रवाशी समाधान व्यक्त करत आहेत.

परिसरातील भाविकांना सप्तश्रृंगी देवीचे दर्शन सुलभ रीतीने व्हावे यासाठी शारदीय नवरात्रोत्सव सुरू होण्यापूर्वी पांगरी गावचे सरपंच आणि मी स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे शिफारस पत्र आणि ह्या मार्गावरील गावांचे प्रस्ताव नाशिक विभाग नियंत्रक आणि कळवण आगार प्रमुख यांना सादर करून बससेवा सुरू करण्याची विनंती केली होती.

# राष्ट्रवादीच्या बैठकीत प्रवेशासाठी कार्यकर्त्यांची गर्दी; खा. बजरंग सोनवणे यांच्याकडून कार्यकर्त्यांना ताकद देण्याचा शब्द

## खा. सोनवणे यांच्यावर विश्वास ठेवून झेडपी सदस्य ते सरपंचांचा राष्ट्रवादी (शरद पवार गट) पक्षात प्रवेश

केज : प्रदिप गायकवाड
( दै. महाभारत )

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर केज तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) अधिक बळकट करण्यासाठी आयोजित केलेली महत्त्वपूर्ण बैठक दि. १६ ऑक्टोबर रोजी येडेश्वरी साखर कारखाना युनिट क्र.१, आनंदगाव सा. येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली. बैठकीत प्रवेशासाठी कार्यकर्त्यांची अक्षरशः गर्दी झाली होती.




या बैठकीत खा. बजरंग सोनवणे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना संबोधित करताना सांगितले की, आगामी निवडणूक ही कार्यकर्त्यांची निवडणूक आहे. पक्षाच्या प्रत्येक कार्यकर्त्याच्या पाठिशी आम्ही ठामपणे उभे आहोत. तुमची ताकद म्हणजेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची खरी शक्ती आहे. त्यांनी कार्यकर्त्यांना सर्वतोपरी सहकार्य आणि ताकद देण्याचा विश्वास दिला.

बैठकीत बनसारोळा येथील माजी जि.प. सदस्य अशोक गायकवाड, माजी सरपंच युवराज काका काकडे, चिंचोलीमाळी येथील लहुजी वस्ताद सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष विठ्ठल झाडे, पिसेगावचे नवनाथ नेहरकर, आनेगावचे माजी सरपंच आप्पासाहेब हंडीबाग, तसेच एकनाथ, विष्णू, भैरवनाथ, श्रीधर, लक्ष्मण, जिवराज, नरसिंग, नवनाथ, अशोक, नानासाहेब हंडीबाग, ज्ञानेश्वर खोडसे, दशरथ हंडीबाग, तुकाराम इंगळे, युसूफवडगावचे विजय भूमकर, शिवानंद व शांतिलिंग खरबड यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) गटात प्रवेश केला.

या प्रवेशामुळे पक्षाला केज तालुक्यात मोठी ताकद मिळाल्याचे जिल्हा पदाधिकाऱ्यांनी सांगितले.बैठकीस राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट) चे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, प्रदेश उपाध्यक्षा मा. आ. संगिता ठोंबरे, मा. आ. पृथ्वीराज साठे, पंचायत समिती केजचे माजी सभापती अशोक तात्या तारळकर, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष बालासाहेब दादा बोराडे, माजी जि.प. सदस्य युवराज गोरे, माजी अध्यक्ष विलास जोगदंड, माजी सभापती ज्ञानेश्वर चवरे, तालुकाध्यक्ष शंकर जाधव, महिला तालुकाध्यक्ष तसलीम इनामदार, शहराध्यक्ष शद्दो खतीब, माजी पं.स. सदस्य बंडू चौधरी, पिंटू ठोंबरे, गुंडाप्पा भुसारी, प्रेमचंद कोकाटे, नगरसेवक भाऊसाहेब गुंड, बालासाहेब जाधव, माजी नगरसेवक कपिल मस्के, शरीफ सय्यद, शितल लांडगे, विमल जोगदंड, तसेच पंचक्रोशीतील सरपंच, उपसरपंच, सोसायट्यांचे चेअरमन, संचालक आणि असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.बैठकीत पक्ष संघटन बळकटीकरण, मतदारांपर्यंत पक्षाची भूमिका प्रभावीपणे पोहोचविणे, आणि आगामी निवडणुकांसाठी एकजुटीने, शिस्तबद्ध पद्धतीने काम करण्याचे आवाहन करण्यात आले.बैठकीच्या शेवटी खा. बजरंग सोनवणे यांनी सांगितले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. आपण सर्वांनी एकजुटीने प्रयत्न केले, तर आगामी निवडणुकांमध्ये निश्चितच विजय आपल्या वाट्याला येईल.

## १ नोव्हेंबर या अर्हता दिनांकावर आधारीत

### पदवीधर मतदार संघाच्या मतदार याद्या नव्याने तयार करण्यासाठी

# राजकीय पक्षासोबत बैठक संपन्न

बीड (प्रतिनिधी)

दिनांक ३० सप्टेंबर, २०२५ (मंगळवार) रोजीपासून पदवीधर मतदार नोंदणी सुरु आहे. भारत निवडणूक आयोगाने ५ औरंगाबाद पदवीधर मतदार संघाच्या दि. ०१ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारीत पदवीधर मतदार संघाच्या मतदार याद्या नव्याने तयार करणे बाबतचा कार्यक्रम घोषीत केलेला आहे. बीड जिल्ह्यातील सर्व पदनिर्देशीत अधिकारी व सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय कार्यालय, सर्व तहसिल कार्यालयामध्ये मतदार नोंदणी कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने बीड जिल्ह्यातील मान्यताप्राप्त राजकीय पक्षाचे प्रतिनिधी यांचेसमवेत दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ४.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये दि. ०१ नोव्हेंबर २०२२ पुर्वी उत्तीर्ण झालेल्या नागरीकांनी पदवीधर मतदार यादी नव्याने तयार होणाऱ्या मतदार यादीमध्ये नोंदणीसाठी नमुना अर्ज १८ भरून नोंदणी करणे अनिवार्य असल्याची माहिती देण्यात आली. मतदार नोंदणी करण्यासाठी पुढील कार्यपध्दीती वापरावी.

# माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या वतीने ३५७ विद्यार्थ्यांना दिवाळी फराळ साहित्य वाटप

गरजु विद्यार्थ्यांचे मोफत दंत तपासणी शिबिर संपन्न

माजलगाव : अमर साळवे
(दै.महाभारत)

येथील गेल्या २३ वर्षांपासून निराधार विद्यार्थ्यांसाठी समाजसेवेचा ध्यास घेऊन कार्यरत असलेल्या माजलगाव विकास प्रतिष्ठानने यंदाही दिवाळी निमित्त गरजू विद्यार्थ्यांना फराळ साहित्याचे मोठ्या प्रमाणावर वाटप केले. बुधवार, १५ ऑक्टोबर २०२५ रोजी लोकनेते सुंदरराव सोळंके नागरी सहकारी पतसंस्था, माजलगाव येथे आयोजित या कार्यक्रमात माजलगाव तालुक्यातील २५० आणि धारूर तालुक्यातील १०७ अशा एकूण ३५७ विद्यार्थ्यांना दिवाळीच्या फराळ साहित्याचे वाटप करण्यात आले.सिंदफणा पब्लिक स्कूल माजलगाव आणि लोकनेते सुंदरराव सोळंके नागरी सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमात आधार प्रकल्पांतर्गत निराधार विद्यार्थ्यांना फराळ साहित्य वाटपासोबतच मोफत दंत चिकित्सा शिबिराचेही



आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एकूण २०१ विद्यार्थ्यांची दंत तपासणी करण्यात आली.सविस्तर वृत्त असे की, माजलगाव प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सौ. मंगलाताई सोळंके आणि सचिव नीला देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली माजलगाव विकास प्रतिष्ठान शैक्षणिक साहित्य वाटप, शैक्षणिक सहली, किशोरवयीन मुलांसाठी कार्यशाळा, महिला मेळावा आणि आरोग्य शिबिर यासारखे विविध उपक्रम राबवत आहे. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पुजनाने झाली. उपस्थित मान्यवरांचे मोगऱ्याचे रोपटे व शाल देऊन स्वागत करण्यात आले. लाभार्थी विद्यार्थिनी ऋतुजा आरगडे हिने या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले. सिंदफणा पब्लिक स्कूलच्या नृत्य शिक्षिका रेखा होके यांनी मुलांच्या दातांच्या स्वच्छतेसाठी वडिलांच्या स्मृतीप्रित्यर्थ मोफत टूथब्रश वाटप केले. प्राचार्य अन्वर शेख यांनी प्रास्ताविक भाषणात प्रतिष्ठानच्या कार्याचा सविस्तर अहवाल सादर केला.

### जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते

# अमृत दुर्गोत्सव २०२५ चा शुभारंभ

## महाराष्ट्रात अमृततर्फे दीपावलीमध्ये होणार विश्वविक्रमी दुर्गोत्सव

बीड / प्रतिनिधी

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे यांच्या वतीने राज्यभर दुर्गोत्सव २०२५ या भव्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, या उपक्रमाचा बीड जिल्हा स्तरावरील शुभारंभ जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते आज संपन्न झाला. या प्रसंगी अमृत संस्थेचे जिल्हा व्यवस्थापक विशाल जोशी उपस्थित होते.

या उपक्रमाचा प्रमुख उद्देश म्हणजे महाराष्ट्रातील नागरिकांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांविषयी अभिमानाची भावना वृद्धिंगत करणे आणि युनेस्कोने नुकतेच जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट केलेल्या १२ ऐतिहासिक गड-दुर्गांच्या माध्यमातून स्वराज्याची परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे हा आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी शुभारंभ प्रसंगी नागरिकांना आवाहन केले की, सीं; बीड जिल्ह्यातील नागरिकांनी आपल्या घराच्या अंगणात किंवा सोसायटी परिसरात गड-दुर्गांच्या प्रतिकृती साकारून दुर्गोत्सवात सहभागी व्हावे.यामधून शिवचरित्राचा अभिमान प्रत्येकाच्या मनात सखोलपणे रुजेल.

दुर्गोत्सव २०२५ - उपक्रमाचे वैशिष्ट्ये :

अमृत संस्थेच्या वतीने या राज्यव्यापी उपक्रमांतर्गत नागरिकांना आवाहन करण्यात येते की त्यांनी आपल्या घरात,शाळा, कार्यालय किंवा सार्वजनिक ठिकाणी महाराष्ट्रातील १२ गड-दुर्गांपैकी कोणत्याही एका दुर्गाची प्रतिकृती तयार करावी आणि त्या प्रतिकृतीसह घेतलेला सेल्फी ु.वींसींरीं.ले या संकेतस्थळावर अपलोड करावा. या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्वांना मुख्यमंत्री महोदयांच्या स्वाक्षरीचे अभिनंदनपत्र पाठवण्यात येईल.तसेच अमृत विद्या या डिजिटल लर्निंग प्लॅटफॉर्मवरील शिवछत्रपतींचा गौरवशाली इतिहास आणि आजच्या काळातील प्रेरणा या विषयावरील रु. ९९९/- किंमतीचे ऑनलाइन प्रशिक्षण सर्व सहभागींसाठी निशुल्क उपलब्ध करून दिले जाणार आहे.

१२ गड-दुर्गांची यादी :

रायगड,राजगड,प्रतापगड, सिंधुदुर्ग,साल्हेरदुर्ग,खांदेरीचा दुर्ग,जिंजी,पन्हाळगड, शिवनेरी,विजयदुर्ग,लोहगड आणि पद्मदुर्ग (सुवर्णदुर्ग).गड-दुर्ग हे आपल्या स्वाभिमानाचे प्रतीक आहेत. प्रत्येक कुटुंबाने या उपक्रमात सहभागी होऊन शिवरायांना अनोखी मानवंदना द्यावी, असे प्रतिपादन अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी केले आहे.

# जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्हयात कायदा व सुव्यस्थेबाबत आगामी काळात दि. १५ ऑक्टोबर रोजी राष्ट्र परिवर्तन मोर्चा व राज्य परिवहन महामंडळ बीड यांचा मुंबई येथे होणा-या आत्मक्लेश आंदोलनास पाठींबा तसेच आरक्षणाच्या अनुषंगाने विविध संघटनाकडून मोर्चा, सभा आयोजित करण्यात येत आहे. आगामी काळात दिवाळी सण साजरा होणार आहे. तसेच राजकिय पक्ष संघटनेच्या वतीने न्याय मागण्यासाठी विविध प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामूळे अचानक घडणा-या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे.

दिनांक १५ आक्टोबर २०२५ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दि. २९ ऑक्टोबर २०२५ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.

जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्ल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक

# पत्रकार सतीश पाटील यांची कन्या रुद्राक्षी ची सिंधुदुर्ग विभागीय स्पर्धेसाठी निवड

कोल्हापूर/ प्रकाश कांबरे
( दै. महाभारत )

कोल्हापूर : कुरुंदवाड (ता. शिरोळ) येथे झालेल्या शालेय जिल्हास्तरीय ग्रामीण कॅरम स्पर्धेत राजेंद्र पाटील विद्या मंदिर हालोंडी ची विद्यार्थिनी कु. रुद्राक्षी सतीश पाटील हिने शालेय जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेत १४ वर्षे वयोगटात उल्लेखनीय कामगिरी करत यश संपादन केले आहे. तिच्या अचूक खेळ, शांत स्वभाव आणि उत्कृष्ट रणनीतीच्या जोरावर तिने प्रतिस्पर्ध्यांवर मात करत यश संपादन केले. या



कामगिरीची दखल घेत तिची सिंधुदुर्ग येथे होणाऱ्या विभागीय स्तरावरील कॅरम स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

रुद्राक्षीच्या या यशामुळे शिरोली शहरासह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. तिच्या शाळेने आणि शिक्षकांनी, तिचा सत्कार करून भविष्यातील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागातही क्रीडा प्रतिभेला योग्य संधी मिळाल्यास विद्यार्थी मोठ्या पातळीवर आपली कामगिरी दाखवू शकतात याचे उत्तम उदाहरण रुद्राक्षीने घालून दिले आहे.

# येवला तालुका पोलिसांनी हत्यारांसह आंतरजिल्हा गुंडांची टोळी केली जेरबंद



नाशिक : शांताराम दुनबळे
(दै महाभारत)

खुनाची सुपारी घेवून जिवघेणी मारहाण करणाऱ्या आंतरजिल्हा गुंडांच्या टोळीला येवला तालुका पोलिसांनी गावठी कटटा व कोयता आदी हत्यारांसह अवघ्या एक तासात जेरबंद केले आहे.याबाबत पोलीस यांनी दिलेल्या माहितीनुसार (दि. १२) दुपारी साडेचार वाजेचे सुमारास सोमठाणदेश (ता. येवला) गावातील ग्रामस्थांनी पोलीसांना फोन करून, गावातील गौरव दत्तु सोनवणे यांस व त्यांचे कुटुंबियांना शेतीचे वादातुन बाहेरील ८ ते १० गुंडांकडुन मारहाण करण्यात येत असल्याचे कळवले. तसेच मारहाण करणारे १ सफेद व १ काळया रंगाच्या चारचाकी वाहनाने कोपरगांवचे दिशेने निघाले आहे, अशी माहिती दिली. पोलीसांचे विशेष पथक तात्काळ रवाना होवुन सोमठाणदेश गावाकडे जात असतांना धुळगांव शिवारात पोलीसांना वरील वर्णनाची वाहने भरधाव वेगात येतांना दिसली. पोलीसांनी त्यांना थांबण्याचा इशारा केला परंतु ते न थांबता येवल्याचे दिशेने गेल्याने पोलीसांनी त्यांचा सिनेस्टाईल पाठलाग करून दोन्ही वाहने कोपरगांव रोडवर आसरा लॉन्सचे समोर आडवुन त्यातील ८ इसमांना ताब्यात घेतले. तर दोन इसम पळुन गेले.



# अनिल मिश्रा यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला भर चौकात फाशी

छ. संभाजी नगर
(दै.महाभारत)

भारतीय संविधान निर्माते विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एका समाजाचे नव्हे, तर संपूर्ण देशाचे आदर्श आहेत अशा महामानवावर गरळ ओकणाऱ्या मनुवादी पाखंडी अनिल मिश्रा याने खालच्या पातळीवर जावून केलेल्या वादग्रस्त वक्तव्यामुळे सर्वसामान्य बहुजन जनतेच्या भावना दुखावल्या आहेत आणि संविधानाच्या मूल्यांवर हल्ला झालाआहे.

मनुवादी पाखंडी अनिल मिश्रा याने भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना इंग्रजाचे गुलाम व एजंट बोलल्या बद्दल जे अत्यंत निंदनीय आणि असंवैधानिक वक्तव्य केल्यामुळे रिपब्लिकन पार्टी ऑफ महाराष्ट्र पक्षाच्या वतीने पक्ष प्रमुख राजूभाई साबळे राज्य उपाध्यक्ष अँड.अविनाश थिट्टे यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये पाखंडी अनिल मिश्राच्या प्रतिकात्मक पुतळ्याला आकाशवाणी चौकात फाशी देऊन त्याच्या फोटोला जोडे मारून तीव्र निषेध केला.त्यामुळेच, संविधानविरोधी विचार पसरवणाऱ्या अशा व्यक्तींना कायद्यानुसार कठोर कारवाई करून कडक शिक्षा झालीच पाहिजे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सन्मानासाठी आणि संविधानाच्या रक्षणासाठी आमचा संघर्ष यापुढेही चालू राहील.

तसेच अहिल्यानगराचा (अहमदनगर) राष्ट्रवादीचा आमदार चिथावणीखोर संग्राम जगताप याने आपल्या भडकाऊ भाषणात दिवाळीत हिंदूच्याच दुकानातून दिवाळीची खरेदी करा असे आव्हान केले होते त्याचा हेतू हिंदू, मुस्लिम या दोन समाजात तेढ निर्माण करून हिंदू मुस्लीम यांच्यातील जातीय सलोखा बिघडावण्याचे काम करीत आहेत या वेळी निषेध म्हणून त्याच्याही फोटोला जोडे मारून निषेध व्यक्त केला आहे.

आज 'जोडो-मारा' आंदोलन करून पक्षाच्या वतीने संतप्त व्यक्त केला आहे. या आंदोलनातून आम्ही सरकारला आणि न्यायव्यवस्थेला स्पष्टपणे सांगू इच्छितो की, पाखंडी मानसिक दृष्ट्या विकलांग असलेला मनूवादी ड.अनिल मिश्रा याच्यावर तातडीने देशद्रोहाचे गुन्हे दाखल करण्यात यावे आणि बार कौन्सिलने त्याचा वकिलीचा परवाना त्वरित रद्द करावा आणि अहिल्यानगराचा आमदार संग्राम जगताप याची आमदारकी रद्द करावी जसे की असे लोकप्रतिनिधी म्हणून समाजाला घातक ठरू शकतात आणि मागील दहा दिवसांपासून अनिल मिश्रा याच्या भडकाऊ वक्तव्याने सोशल मीडियावर फेक आयडी वाले इंस्टाग्राम व फेसबुकवर अनेक तरुण व्हिडिओ व टेक्स पोस्ट द्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची खुलेआम विटंबना करत आहेत सायबर गुन्हे शाखेने तात्काळ सर्व अकाउंट बंद करून संबधितांवर ड३/ढ४ क्ट नुसार सरसगट गुन्हे दाखल करावेत. रिपब्लिकन पार्टी ऑफ महाराष्ट्र पक्षाच्या वतीने छत्रपती संभाजीनगर येथील आकाशवाणी चौकात जोडो मार आंदोलनाचे नेतृत्व जिल्हा अध्यक्ष दिनेश गवळे युवा शहर अध्यक्ष अर्शद लखपती यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले या वेळी जवाहर नगर पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी यांच्या मार्फत पोलीस आयुक्त यांना निवेदन देण्यात आले.

# विभागीय पातळीवर निवड झालेल्या मुखेड शाळेतील खेळाडूंचा गुणगौरव

नाशिक : शांताराम दुनबळे
( दै महाभारत )

मुखेड ता.येवला येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील खेळाडूंची विभागीय पातळीवर निवड झाल्याने यशस्वी खेळाडूंचा गुणगौरव मविप्रचे येवला तालुका संचालक नंदकुमार बनकर यांच्या हस्ते शनिवार दि.११ रोजी विद्यालयात गुणगौरव करण्यात आला.१९ वर्ष वयोगट १०० मीटर धावणे शुभम बागुल प्रथम,१७ वर्ष वयोगट १०० मीटर धावणे कुणाल गांगुर्डे प्रथम,१९ वर्ष वयोगट १०० मीटर हर्डल्स रुपाली सोनवणे प्रथम आदी खेळाडूंसह मार्गदर्शक प्रशिक्षक शाम शिंदे, आकाश आहेर यांचा गौरव करण्यात आला. गुणगौरव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मविप्रचे येवला तालुका संचालक नंदकुमार बनकर हे होते.अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना श्री.बनकर यांनी यशस्वी खेळाडूंनी मिळवलेले यश हे त्यांच्या मेहनतीचे फळ आहे.असेच सातत्य ठेवून पुढील स्पर्धेतही यश मिळवावे यासाठी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रम प्रसंगी शालेय समितीचे अध्यक्ष विश्वासराव आहेर, उच्च माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष कृष्णराव गुंड,प्राचार्य महेंद्र भगत,पर्यवेक्षिका स्वाती




चंदनशिव,ज्येष्ठ शिक्षक दिलीप खताळ ,आप्पासाहेब बडवर,कौतिक पवार,राजेंद्र बोराळे,धनराज चौरे,बी.एम.मगर, शुभांगी धरम,हेमलता पाटील आदी सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी विद्यालयातील २५ मुले,२६ मुली असे एकूण ५१ खेळाडूंची विविध क्रीडा प्रकारात येवला तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेतून जिल्हा पातळीवर खेळण्यासाठी निवड झाली होती. यशस्वी खेळाडूंचे सर्वच स्तरातून अभिनंदन होत आहे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कौतिक पवार यांनी केले.आभार प्रदर्शन दिलीप खताळ यांनी केले.

दैनिक जय महाभारत
संपादक - विजयकुमार वाव्हळ

हे पत्र, मुद्रक, प्रकाशक व मालक विजयकुमार सुखदेव वाव्हळ यांनी सुयोग ऑफसेट प्रिंटर्स येथे छापुन निर्मिती प्रिंटस् कबाड गल्ली, जुन्या पोलीस स्टेशन समोर, बीड ४३११२२ येथुन प्रकाशित केले.
संपादक - विजयकुमार वाव्हळ Mo.9028429999 / 9657299999 :: कार्यकारी संपादक ::प्रथमेश विजयकुमार वाव्हळ Mo.9075409999
RNI.NO.MAHMAR/2015/64418 मुख्य कार्यालय :- प्रथमेश गॅस एजन्सी, पहिला मजला गेवराई - बीड रोड गेवराई ता.गेवराई जि. बीड - ४३११२७
संपर्क -Mo.9403825700/94058 17999 jaymahabharat2015@gmail.com * टीप : या अंकातील प्रसिध्द झालेल्या प्रत्येक बातमीशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# कोल्हापूर २७ ऑक्टोबर रोजी बिंदू चौक येथून जिल्हाधिकारी कार्यालयावर लोकशाही संविधान सन्मान महामोर्चा ....

कोल्हापूर/प्रकाश कांबरे
(दै.महाभारत)

कोल्हापूर : ( प्रतिनिधी ) देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश ना. भूषणजी गवई यांच्या अवमान प्रश्नी संपूर्ण देशभर संतापाची लाट उसळलेली आहे. आंबेडकरवादी, पुरोगामी, संविधान प्रेमी जनतेने आपापल्या परीने आंदोलन केलेली आहेत. कोल्हापूरच्या शाहू महाराजांच्या पुरोगामी भूमीमध्ये एकत्रितरित्या आंदोलनाचा आवाज बुलंद करण्यासाठी आज आंबेडकरी समाज, पक्ष, संघटना यांची आणि पुरोगामी संघटनांची एकत्रित बैठक मिस क्लार्क बोर्डिंग, बिंदू चौक कोल्हापूर येथे झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ बहुजन नेते दिगंबर लोहार होते. दि. २७ ऑक्टोबर रोजी बिंदू चौक, कोल्हापूर येथून जिल्हाधिकारी कार्यालयावर लोकशाही संविधान सन्मान महामोर्चा निघणार आहे, या महामोर्चा मध्ये कोल्हापूर जिल्ह्यासह परिसरातून पन्नास हजार संविधान प्रेमी जनता सहभागी होणार असे आंबेडकरी समाज पक्ष संघटनांचे निमंत्रक प्रा. शहाजी कांबळे यांनी जाहीर केले. प्रा. विजय काळेबाग यांनी या भूमिकेला पाठिंबा व्यक्त करत संविधानाला विरोध करण्यासाठी वेगवेगळ्या मार्गाने होत असलेले प्रयत्न भविष्यात लोकशाही धोक्यात आणण्यासाठीच आहेत त्याला मोठ्या ताकदीने आणि विचारांनी प्रतिकार करु असे सांगितले. सनातन वाद्यांच्या मनसुब्यांना प्रतिकार करण्यासाठी कोल्हापूरच्या शाहू भूमीतून अचूक नियोजन करत या मोर्चाने सुरुवात केली जाईल अशी भूमिका ज्येष्ठ नेते व्यंकाप्पा भोसले यांनी मांडली. रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ नेते बी. के. कांबळे म्हणाले की, या मोर्चामध्ये सामील होण्यासाठी जिल्ह्यातील सर्व तालुक्यात आणि गावोगावी प्रचार यंत्रणा राबवली जाईल, आंबेडकरी जनतेचा शाहूनारा ऐतिहासिक करण्यासाठी घराघरातून बहुजनवादी जनतेने बाहेर पडावे असे आवाहन हि त्यांनी केले.

प्रा. अशोक चोकाककर यांनी या मोर्चामध्ये धम्म संघटना, संविधान प्रेमी, उच्चशिक्षित अधिकारी, कर्मचारी वर्ग सहभागी होण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे जाहीर केले. रिपब्लिकन नेत्या रूपाताई वायदंडे यांनी महिलांच्या



सहभागा बरोबरच मातंग समाज मोठ्या संख्येने या मोर्चात उपस्थित राहणार आहे व त्यासाठी आतापासून नियोजन करत असल्याचे सांगितले. बंडखोर सेनेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव आवळे (आण्णा) यांनी आंबेडकरी चळवळ हि मातंग समाजाचा थोरला भाऊ म्हणून आम्ही या मोर्चात नेटाने सहभागी होणार आहोत असे जाहीर केले व मोर्चा संबंधित प्रसिद्धी माध्यमांची संपूर्ण जबाबदारी घेत असल्याचे घोषीत केले. सिटी क्रिमिनल बार असोशिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. दत्ताजीराव कवाळे यांनी ना. भूषणजी गवई यांचे अवमान प्रसंगा मागची संपूर्ण घटना मूळ ठर्शीं–ीरींळेप याचिकेसह विषद करून मातंग समाजाला सहभागी करून घेण्याचे आवाहन केले. सिटी क्रिमिनल बार असोशिएशनचे अध्यक्ष ॲड. रणजीत कवाळे यांनी ना. भूषणजी गवई यांचेवर हल्ला झाला नसून, हल्ल्याचा प्रयत्न झाल्याची दुरुस्ती करत मोर्चास सर्व वकील फोरम उपस्थित ठेवण्याचे जाहिर केले.

सदानंद दिघे यांनी आपली भूमिका मांडत असताना हि शाहू भूमीतील ललकारी देशाचे पंतप्रधान आणि गृहमंत्री यांच्या पर्यंत पोहोचली पाहिजे अशी भूमिका व्यक्त केली. यावेळी पांडुरंग कांबळे, सुशीलकुमार कोल्हटकर, सुरेश सावर्डेकर, विद्याधर कांबळे, संजय जिरगे, अनिल धनवडे, बबन शिंदे, निवास सडोलीकर, बाजीराव नाईक, भाऊसाहेब काळे, जयसिंग जाधव, सुजित समुद्रे, गोपाळराव साठे, सोमनाथ घोडेराव, बाळासाहेब कांबळे, यशवंत कांबळे, भीमराव कांबळे, शशिकांत कांबळे, मच्छिंद्र कांबळे, प्रमोद सनदी, प्रताप बाबर यांनी यांनी भूमिका मांडली.

बैठकीस ॲड. विवेक सावंत, अनंत मांडुकलीकर, संभाजी भोसले, अल्पसंख्यांक समाजाचे व रिपब्लिकन पक्ष वाहतूक आघाडीचे अध्यक्ष सलमान मौलवी, अर्जुन कांबळे म्हाकवेकर, रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब कामत, रिपब्लिकन सेनेचे नेते रमेश कांबळे हुपरीकर, अक्षय साळवी, दयानंद दाभाडे, प्रवीण आजरेकर, विनोद शिंदे, बटू भामटेकर, शैलेश सोनुले, भालचंद्र दबडे, प्रतीक कांबळे, अविनाश कांबळे, राकेश कांबळे, लताताई नागावकर, वंदना कांबळे, वंदना वाघमारे, हेमाश्री यादव, रुपाली वराळे यांच्यासह दोनशे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी के.एम.टी. कर्मचारी महासंघाने मोर्चास पाठिंबा व्यक्त केला. बैठकिस मातंग समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता. भटक्या विमुक्तांचे नेते व्यंकाप्पा भोसले यांनी जाहीर पाठिंबा दिला. ओबीसी सेवा संघाचे महाराष्ट्राचे प्रमुख नेते दिगंबर लोहार यांनी ओबीसी समाज मोठ्या संख्येने सहभागी होईल हे जाहीर केले. भटक्या विमुक्तांचे संभाजी भोसले यांनी आपल्या पारंपारिक वेशात हजर राहण्याचे जाहीर केले. आभार अनिल धनवडे यांनी मानले.

---

# इंजिनिअर्स अँड आर्किटेक्ट इचलकरंजीतर्फे जागतिक आर्किटेक्चर दिन उत्साहात

इचलकरंजी / संभाजी गुरव
(दै . महाभारत )

पाणी, हवा, सूर्य, जमीन व अवकाश या पंचमहाभूतांनी व्यापलेल्या या वसुंधरेस काही कारणाने घरघर लागत चालली आहे. ती घरघर मानवाने थांबवली नाही तर त्याचा अंत निश्चित आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध आर्किटेक्ट ग्रीन बाबा प्रमोद चौगुले यांनी केले.असोशिएशन ऑफ इंजिनिअर्स अँड आर्किटेक्ट इचलकरंजी आणि अल्ट्राटेक सिमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक आर्किटेक्चर दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ग्रीन बिल्डिंग न्ड कम्युनिटीज या विषयावर मार्गदर्शन करताना श्री. चौगुले बोलत होते.यावेळी जागतिक आर्किटेक्चर दिनाचे औचित्य साधत प्रसिद्ध आर्किटेक्ट उदय सावंत, अभय पिसे आणि सचिन बोरा यांचा ग्रीन बाबा आर्किटेक्ट प्रमोद चौगुले यांचे हस्ते स्मृतीचिन्ह, शाल व फेटा देऊन गौरव करण्यात आला. तसेच प्रमोद



अनंतसिंग

चौगुले यांचा अल्ट्राटेक सिमेंटचे विभागीय तांत्रिक हेड शितलराज सिंदखेडे आणि टेरीटरी सेल्स हेड अविनाश जेऊरकर यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

पुढे बोलताना श्री. चौगुले यांनी, वास्तु निर्मिती करीत असताना जगभरात ३८ टक्के पर्यंतचे प्रदूषण यातून निर्माण होते. त्यामुळेच आपली सगळ्यांची ही जबाबदारी वाढते. नद्या, गाव स्वच्छ ठेवणे, वास्तू निर्मिती करताना नैसर्गिक वातावरणाचा, नैसर्गिक स्त्रोतांचा वापर करणे आणि यातून जे तयार होते त्यास ग्रीन बिल्डिंग असे म्हणून याचे महत्त्व सर्वसामान्य मंडळींना पटवून देणे यावर अधिकाधिक भर देण्याची गरज व्यक्त केली. नैसर्गिक असमतोल जागतिक तापमान व रोगराईत होत असलेली वाढ या सगळ्यांचे मूळ प्रदूषण असून हे कमी करण्यासाठी ग्रीन बिल्डिंगची गरज भासते आहे. त्यासाठी आपण सगळे मिळून या मोठ्या कार्यासाठी हात मिळवणे गरजेचे वाटते, असे त्यांनी सांगितले.

प्रारंभी आर्किटेक्ट प्रमोद चौगुले यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व आर्किटेक्ट चार्ल्स कोरिया यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. स्वागत असोशिएशन ऑफ इंजिनिअर्स अँड आर्किटेक्ट इचलकरंजीचे प्रेसिडेंट राजेंद्र खंडेराजुरी यांनी केले. यावेळी सुरेख नियोजनाबद्दल अल्ट्राटेक सिमेंट डीलर नितीन धूत व घनश्याम सावलानी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शितलराज सिंदखेडे यांनी अल्ट्राटेक सिमेंटच्या टेक्निकल प्रॉडक्ट व ग्रीन बिल्डिंग सर्टिफिकेट याची माहिती दिली.

यावेळी असोशिएशन ऑफ इंजिनिअर्स अँड आर्किटेक्ट इचलकरंजीचे सेक्रेटरी विकास नाईक, जॉ. सेक्रेटरी भरत केटकाळे, ट्रेझरर नितीन शेट्टी, विवेक सावंत, रवींद्र तोरस्कर, गिरीश मोकाशी, सुहास रुग्गे, प्रकाश मालवीय, अल्ट्राटेक सिमेंटचे हर्षल धुत, रोहित सावलानी, विभागीय तांत्रिक प्रबंधक कोल्हापूर सागर छांगाणी, चॅनेल रिलेशनशिप मॅनेजर कल्पक मेहता आदी मान्यवरांसह २०० पेक्षा अधिक सदस्य उपस्थित होते. आभार नितीन धूत यांनी मानले.

---

# केशव मुद्देवाड यांना नगराध्यक्ष पदासाठी जनतेचा आग्रह!

भोकर : अनिल डोईफोडे
( दै.महाभारत )

भोकर नगर परिषदेतील सुरू असलेल्या भ्रष्ट कारभार विरोधात भोकर येथील जनता त्रस्त झाली असून भ्रष्टाचाराविरुद्ध संताप व्यक्त केला जात आहे या भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी आणि पारदर्शक प्रशासन निर्माण करण्यासाठी मा. नगरसेवक तथा वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष केशव मुद्देवाड यांना नगराध्यक्ष पदासाठी उमेदवार म्हणून उभे करण्यासाठी जोरदार मागणी स्थानिक नागरिकत्व होत आहे,

केशव मुद्देवाड यांनी नगर परिषदेतील गैरकारभाराविरोधात कोर्टाच्या माध्यमातून कायदेशीर लढा दिला त्यांनी काही कर्मचाऱ्या विरोधात गुन्हे सुद्धा दाखल करण्यात यश मिळवले आहे सत्तेची बाजू निर्भीडपणे मांडणारे कोणत्याही दबावाला बळी न पडता आणि भीक न घालणारे असे त्यांचे व्यक्तिमत्व असल्याने नागरिकांमध्ये यांच्या बद्दल विश्वास व सहानुभूती निर्माण करणारे आहे,

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब उर्फ प्रकाश आंबेडकर यांच्या आदेशानुसार भोकर नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडी सोबत संपूर्ण पॅनल उभे करणार आहेत जिल्हाध्यक्ष राजेश पालमकर आणि केशव मुद्देवाड यांच्या नेतृत्वाखाली हा संपूर्ण लढा लढवण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

भोकर नगर परिषदेतील भ्रष्टाचाराच्या पार्श्वभूमीवर सशक्त पारदर्शक आणि सर्वसामान्य जनतेसाठी कार्य करणाऱ्या निस्वार्थ नेतृत्वाची गरज निर्माण झाली आहे अशा परिस्थितीत डॅशींग नेतृत्व असणारे केशव मुद्देवाड यांचे नाव सध्या जनतेतून पुढे जाणे ही बाब केवळ अपेक्षितच नव्हे तर आवश्यक वाटते समाजातील सर्व घटकांना विश्वासात घेऊन चालणारे



अन्याय अत्याचारा विरुद्ध लढणारे आणि प्रामाणिक राजकारण करणारे नेतृत्व म्हणून यांना आयुष्यात नगराध्यक्ष पदाची जबाबदारी मिळेल अशी भाकरकरांची अपेक्षा आहे बघूया तर धन दांडगे यांच्या विरोधात संविधान संविधान रक्षकाची लढाईत बाजी कोण मारेल हे पाहण्यासाठी भोकरची जाणता मात्र उत्सुक आहे

---

# सरसगट मदतीच्या नावाखाली शेतकऱ्यांची फसवणूक चुकीचे पंचनामे आणि तुटपुंज्या मदतीवर बोळवण

परळी / विकास वाघमारे
(दै.महाभारत)

सरसगट मदतीच्या नावावर शेतकऱ्यांच्या तोंडाची पाने पुसण्याचे काम सरकारकडून करण्यात आले असून जिल्ह्यात लाखो हेक्टर शेती क्षेत्र हे बागायती असताना बागायती मदतीपासून वंचीत ठेवण्याच्या संतापजनक प्रकार जिल्ह्यात घडला असून खरडून गेलेल्या जमिनी व विहिरीचे वास्तवीक पंचनामे करण्यात यावे, भावांतर योजना तर दूरच पण किमान शासकीय हमीभावाने सोयाबीन, कापूस खरेदी केंद्र सुरू करावे यासह इतर मागण्याकरिता बलिप्रतिपदा दिनी किसान सभा शेतकऱ्यांना घेऊन आंदोलन करणार असल्याची माहिती किसान सभेने दिली आहे.

सप्टेंबर मधील अतिवृष्टी आणि महापूर यामुळे जिल्ह्यातील शेती क्षेत्राचे अभूतपूर्व नुकसान झाले आहे.जिरायती, बागायती शेती क्षेत्र आणि त्यावरील पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. या विदारक परिस्थितीत प्रशासनाने जिल्ह्यात पाटबंधारे विभागाच्या कमांड एरिया अर्थात सिंचन क्षेत्र असलेली २ लाख हेक्टर शेती क्षेत्र हे बागायती असताना जिल्हा प्रशासनाने केवळ १८ हजार एवढेच क्षेत्र बागायती दाखवल्याने बागायती क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांना देखील जिरायती क्षेत्राप्रमाणे तुटपुंज्या मदतीवर बोळवण करण्याचे काम प्रशासन आणि सरकारने केले आहे. बुजलेल्या, खचलेल्या विहिरीसाठी देखील अल्प मदत करत वाहून व खरवडून गेलेल्या शेतीची कामे देखील रोजगार हमी योजनेतून करणार असे सांगण्यात आले मात्र अद्याप ही यावर कोणतेही कार्यवाही सुरू करण्यात आलेली नाही.

जिल्ह्यात काही अंशी शेतकऱ्यांना सोयाबीन, कापूस या सारखे कमी उतारा आलेले पीक देखील बाजारात कवडीमोल विकावे लागत असल्याने शासनाने तात्काळ हमीभावाने खरेदी केंद्र सुरू करावी. घोषीत केलेल्या कोट्यवधी रकमेपैकी दिवाळी गोड करण्याच्या नावाखाली केवळ ४५ रु गुंठा एवढी सरकारी मदत शेतकऱ्यांच्या खात्यात मिळत असल्याने सरकारी मदत म्हणजे जखमेवर मीठ लावण्यासारखी असून या परिस्थितीत किसान सभा पूर्णपणे शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढणार आहे.



४२ रुपये गुंठ्यानं हेक्टरी ४२८१ रुपये ची अतिवृष्टीची मदत काही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होऊ लागली आहे जी अत्यंत तुटपुंजी व तोंडाला पान पुसणारी आहे.बुजलेल्या, खचलेल्या विहिरी यासाठी एमआरजीएस अंतर्गत केवळ ३० हजार रु मदत, या विरोधात तर कर्जमाफी आणि हमीभावाने खरेदी केंद्र सुरू करा यासाठी किसान सभा बलिप्रतिपदेच्या दिवशी दि २२ ऑक्टोबर रोजी इडा पिडा टळो बळीच राज्य येवो यासाठी गावा–गावात, चौका–चौकात शेतकरी एकत्र येऊन सरकारविरोधी आंदोलन करणार आहेत.

---

# गांजा तस्करी प्रकरणी कल्याण पोलिसांकडून १७ आरोपींवर मोक्का

## डी सी पी अतुल झेंडे यांची ठाणे पोलीस आयुक्तालया अंतर्गत पहिलीच आणि सर्वात मोठी धडाकेबाज कारवाई

बोरघर / माणगाव : विश्वास गायकवाड
( दै. महाभारत )

तरुणाईला व्यसनाच्या विळख्यात ओढणाऱ्या गुन्हेगारां विरोधात कल्याण पोलिसांकडून मोठी कारवाई करण्यात आली आहे. खडकपाडा पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या (एनडीपीएस) गांजा तस्करी प्रकरणात तब्बल १७ आरोपींविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोक्का) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत गांजा तस्करीप्रकरणी मोक्कांतर्गत झालेली अशा प्रकारची ही पहिलीच कार्यवाही आहे.



खडकपाडा पोलीस ठाण्यात अंमली पदार्थ विरोधी कायदा १९८५ सह भारतीय हत्यार कायदा कलम प्रमाणे २ ऑगस्ट २०२५ रोजी दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास कल्याणचे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष कार्यवाही पथकाकडून केला जात आहे.

या तपासादरम्यान आतापर्यंत १३ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून तब्बल ११५ किलो गांजा, गांजा वाहतुकीसाठी वापरलेल्या २ मोटारकार, १ बुलेट, १ ऑटो रिक्षा, १ क्टीव्हा, १ पिस्तुल, २ जिवंत काडतुसे, २ वॉकी–टॉकी संच चार्जरसह असा सुमारे ७० लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथे २१ ऑगस्ट रोजी झालेल्या कारवाईत एकाच गुन्हेगारकडून ६२ किलो गांजा, पिस्तुल– वॉकी–टॉकी संच जप्त करण्यात आले होते.

या प्रकरणाच्या तपासात अजून ४ आरोपींची नावे समोर आली असून त्यांचा शोध सुरू आहे. प्राथमिक चौकशीतून उघड झाले आहे की ही टोळी मागील तीन वर्षांपासून अंमली पदार्थांची खरेदी–विक्री, तस्करी व पुरवठा करून अवैध मार्गाने मोठा आर्थिक फायदा मिळवत होती. आरोपी एकमेकांच्या संपर्कात राहून कधी एकत्र तर कधी स्वतंत्रपणे विविध साथीदारांच्या मदतीने हा बेकायदेशीर व्यवसाय करत असल्याची माहिती डी सी पी अतुल झेंडे यांनी दिली.

तसेच या टोळीचा गुफरान हन्नान शेख हा प्रमुख असून त्याच्यासह इतर १६ साथीदारांविरुद्ध मोक्कांतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे. या टोळीने ठाणे, कल्याण, बदलापूर, सोलापूर, पुणे यांसह महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये तसेच आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम परिसरात तरुणाईला अंमली पदार्थाच्या आहारी लावले. व्यसनाधीन झालेल्या तरुणांचे आयुष्य उध्वस्त होत असून, ते गुन्हेगारीकडे वळत असल्याचे गंभीर वास्तव तपासातून समोर आल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

---

## परळी शहर पोलिसांचा कौतुकास्पद पराक्रम!

# २२ हरवलेले मोबाईल शोधून मालकांकडे सुपूर्द ;पोलीस दलावर अभिनंदनाचा वर्षाव

परळी / विकास वाघमारे
(दै.महाभारत)

परळी शहर पोलिसांनी पुन्हा एकदा आपल्या दक्षतेची आणि जबाबदार कार्यपद्धतीची झलक दाखवत प्रशंसनीय कामगिरी बजावली आहे. शहरातील विविध भागातून हरवलेले किंवा चोरीला गेलेले २२ मोबाईल फोन शोधून काढत सुमारे ४ लाख ५८ हजार रुपयांचे मौल्यवान मोबाईल त्यांच्या मूळ मालकांच्या ताब्यात देण्यात आले आहेत. ही कामगिरी परळी शहर पोलिस ठाण्याचे *पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचन* यांच्या नेतृत्वाखाली, तपाशी अधिकारी *पोलीस अमलदार कैलास कोलमवार* व त्यांच्या सहकाऱ्यांच्या परिश्रमातून साध्य झाली. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, सायबर तपास आणि संयमित प्रयत्नांमुळे पोलिसांना हे यश मिळाले आहे. हरवलेल्या मोबाईलचा शोध लागल्याने नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला असून, परळी शहर पोलिसांच्या या जनहितकारी उपक्रमाचे सर्वत्र कौतुक आणि अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अनेकांनी सामाजिक माध्यमांतून व प्रत्यक्ष भेटून पोलीस दलाचे अभिनंदन केले आहे. या कामगिरीमुळे नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ झाला असून, पोलिस यंत्रणा केवळ गुन्हेगारांना पकडण्यासाठी नाही तर नागरिकांचे हक्क सुरक्षित ठेवण्यासाठीही तितकीच कटिबद्ध आहे, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

परळी शहर पोलिसांनी दि.१६ ऑक्टोबर २०२५ रोजी परळी शहर पोलीस ठाण्यात मोबाईल मुळ मालक तक्रारदार यांना मोबाईल शहर पोलीस ठाण्याचे *पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचन* यांच्या हस्ते परत केले. *यावेळी पोलीस अमलदार कैलास कोलमवार, पोलीस हवालदार गोविंद कांदे, विष्णू फड, बलाजी दराडे, मुजमुले, पोलीस कर्मचारी किशोर घटमल, वाहतूक शाखेचे प्रल्हाद भताने आदींची उपस्थिती होती.* मोबाईल हरवलेल्या तक्रारदारांनी पोलीसांच्या कामगिरीवर समाधान व्यक्त केले असुन पोलीसांचे आभार मानले आहे. त्यामुळे पोलीसांची जनमानसात चांगली प्रतीमा निर्माण होण्यास नक्कीच मदत झाली आहे.



सदरची कारवाई बीड जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधिक्षक चेतना तिडके, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषिकेष शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली परळी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. रघुनाथ नाचण, पोउपनि शिंगणे, पोलीस अंमलदार कैलास कोलमवाड, पो.अ. प्रशांत शेळके तसेच टेक्निकल ॲनेलीसेस बीड येथील पोलीस अंमलदार विकी सुरवसे यांनी केली आहे.* परळी शहर पोलिसांचे हे यश केवळ आकड्यांत मर्यादित नसून, त्यांच्या कार्यनिष्ठा, जबाबदारी आणि सेवाभावाचे प्रतीक आहे. *रक्षक तेच खरे सेवक* या उक्तीला साजेसं काम परळी पोलिसांनी करून दाखवलं आहे. पोलिसांनी नागरिकांच्या सुरक्षेसाठी अशाच तळमळीने काम करत राहावे! *परळी शहर पोलीस ठाण्याचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे मनःपूर्वक अभिनंदन!*

---

# ओंकार शुगर फराळे दुसरा हफ्ता प्रती टन १००/–रु प्रमाणे शेतक–यांच्या खातेवर जमा

कुडूत्री : (प्रतिनिधी)

ओंकार शुगर ॲण्ड डिस्टीलरी पॉवर प्रा.लि., फराळे युनिट नं.३ ता. राधानगरी या कारखान्याचा गळीत हंगाम २०२४–२५ मध्ये गाळप झालेल्या ऊसास दुसरा हफ्ता प्रती टन १००/–रु प्रमाणे शेतक–यांच्या बँक खातेवर विना कपात जमा झाला आहे. अशी घोषणा कारखान्याचे चेअरमन मा.श्री. बाबुराव बोत्रेपाटील यांनी केली. यावेळी बोलतांना, गळीत हंगाम २०२४–२५ मध्ये पहिला हफ्ता ३२००/–रु व दुसरा हफ्ता १००/–रु. प्रमाणे असा अंतिम दर ३३००/–रु. प्रती टन प्रमाणे शेतक–यांना असा चांगला भाव दिला आहे.

गळीत हंगाम २०२५–२६ मध्ये गाळपास येणा–या ऊसास चांगला दर देणार असल्याची त्यांनी माहिती दिली. येणारा गळीत हंगाम कारखान्याचे विस्तारीकरण व सहविज प्रकल्पासह चालणार असल्याने शेतक–यांना वेळेवर आधीकचा ऊस दर देणेस शक्य होणार आहे. कारखान्याची यंत्रसामुग्रीची देखभाल अंतिम टप्प्यात असून महिना अखेर पासून तोडणी यंत्रणा राबणार असल्याचे सांगितले. या हंगामासाठी अवश्यक असणारी तोडणी–वाहतुक यंत्रणा सक्षम उभारली असून शेतक–यांनी आपला पिकवलेला ऊस आमच्या कारखान्यास पाठवून सहकार्य करावे असे आव्हान त्यांनी केले. तसेच दिपावली भेट म्हणून गळीतास आलेल्या ऊसास प्रती टन १ किलो साखर सवलतीच्या दरात देणार असल्याचे सांगितले. सर्व शेतकरी, वाहतुकदार, तोडणी मजुर कारखान्याचे सर्व कर्मचारी व अधिकारी यांना दिपावलीच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा दिल्या.

यावेळी कारखान्याचे जनरल मॅनेजर–शत्रुघ्न पाटील, मुख्य शेती अधिकारी–साताप्पा खाडे, चिफ अकौंट–शरद पाटील, चिफ इंजिनियर विनायक पाटील, चिफ केमिस्ट–राजेंद्र पाटील, केनयार्ड सुपर वायझर संभाजीराव देसाई, टाईम किपर प्रशांत कांबळे, कॉम्प्युटर ऑपरेटर– राहुल परिट, हेडक्लार्क–वसंत डवर व सर्व कर्मचारी उपस्थित होते.

ONKAR SAKHAR KARKHANA Pvt.Ltd.

# रायगड जिल्हा दक्षिण विभागाचा संपूर्ण राज्यात डंका

## येवला मुक्तीभूमीवरील धर्मांतर संकल्प दिनात कबड्डी व धावण्याच्या स्पर्धेत दक्षिण रायगड चा प्रथम क्रमांक

बोरघर / माणगाव : विश्वास गायकवाड

( दै. महाभारत ) दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया महाराष्ट्र राज्याच्या वतीने दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ रोजी नाशिक जिल्ह्यातील येवला मुक्तीभूमी येथे ९० वा धर्मांतर संकल्प दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या ऐतिहासिक सोहळ्याला दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया चे राष्ट्रीय कार्याध्यक्ष व समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष माननीय भीमराव आंबेडकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांतील शाखांचे कार्यकर्ते व समता सैनिक दलाचे हजारो जवान या मुक्तीभूमीवर एकत्र जमले होते.प्रत्येक जिल्ह्यातून आलेल्या दलांनी संचलन आणि परेड द्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केले.या भव्य सोहळ्यात रायगड जिल्हा दक्षिण विभागाने या आयोजित कार्यक्रमात पुरुष व महिला कबड्डी स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला तसेच महिला धावणी स्पर्धेत संस्कृती सोनावणे आणि



सेजल साळुंखे,तर पुरुष धावणी स्पर्धेत अंकीत जाधव आणि राज शिर्के यांनी उल्लेखनीय कामगिरी करून जवळपास ६ बक्षिसे रायगड जिल्हा दक्षिण विभागाने पटकावले आहेत,या सर्व जिंकलेल्या स्पर्धकांचे बक्षिस वितरण माननीय भीमराव साहेब आंबेडकर,राष्ट्रीय उपाध्यक्ष एस के भंडारे व अन्य राष्ट्रीय पदाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले.

रायगड जिल्हा दक्षिण विभाग संरक्षण उपाध्यक्ष रवींद्र गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण समता सैनिक दल नाशिक येवला या ठिकाणी उपस्थित होते, विशेषतः महाड तालुका शाखेतील समता सैनिक दलाचे जवान यांची जास्त प्रमाणात उपस्थिती होती आणि रायगड जिल्हा दक्षिण विभाग अध्यक्ष संतोष जाधव यांनी त्या ठिकाणी आपल्या जिल्ह्याचे नेतृत्व केले त्यांच्या समवेत कोषाध्यक्ष चंद्रकांत गायकवाड,संघटक सुर्यकांत तांबे अन्य जिल्हा व तालुका पदाधिकारी उपस्थित होते.येवला मुक्तीभूमीचे ऐतिहासिक महत्त्व फार मोठे आहे.येवला ही भूमी भारतीय इतिहासातील एक पवित्र आणि परिवर्तनवादी स्थळ आहे.याच ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराचा निर्णय घेत समाजातील शतकानु शतकांच्या अन्याय,विषमता आणि अस्पृश्यतेविरुद्ध क्रांतीची मशाल पेटवली.९० वा धर्मांतर संकल्प दिन हा केवळ उत्सव नव्हे तर बाबासाहेबांच्या विचारांचा आणि धम्मपरंपरेचा नव्याने जागवलेला संकल्प ठरला. या प्रसंगी रायगड जिल्हा दक्षिण विभागाच्या समता सैनिक दलाने केलेली उत्कृष्ट कामगिरी राज्यातील इतर जिल्ह्यांसाठी प्रेरणादायी ठरली आहे.

# राष्ट्रीय आथेलेटिक स्पर्धेत पटकाविले कांस्य पदक

## महाराष्ट्राच्या शिरपेचात ब्रह्मपुरीच्या प्रणयने रोवला मानाचा तुरा




**ब्रम्हपुरी : रुपेश देशमुख (दै. महाभारत )**

**भुवनेश्वर येथे पार पडलेल्या १८ वर्षाखालील १००० मीटर धावण्याच्या शर्यतीत महाराष्ट्रातील ब्रम्हपुरी येथील प्रणय गणेश उपासे (१७ ) याने तृतीय क्रमांक मिळवत कांस्य पदक पटकाविले आहे. राष्ट्रीय आथेलेटिक स्पर्धेत स्थान मिळवून प्रणयने ब्रह्मपुरीच्या शिरेपेचात मानाचा तुरा रोवला आहे.**

वडिलांचे छत्र हरपलेला प्रणय आई व छोट्या बहिणीसोबत येथील पेठ वॉर्डात वास्तव्यास आहे. तुटपुंजी शेती असल्याने आई मजुरी करते. प्रणयचे १ -१० वी पर्यंतचे शिक्षण हिंदू ज्ञान मंदिर येथे झाले. ११ वीला त्याने लो. टी. विद्यालयात प्रवेश घेतला. सध्या तो १२ वीला आहे. लहानपणापासून खेळाची आवड असल्याने त्याने नियमित धावण्याचा सराव केला. नागपूर येथील मार्गदर्शक गजानन ठाकरे व ब्रम्हपुरी येथील मार्गदर्शक रोहित बुरांडे यांचे प्रणयला मार्गदर्शन लाभले. ४० व्या राष्ट्रीय आथेलेटिक स्पर्धा दि. १० - १४ या कालावधीत भुवनेश्वर येथे पार पडली. त्यात हरियाणाचा प्रिन्स प्रथम, द्वितीय क्रमांक उत्तराखंड येथील सुरज सिंग याने मिळविला.तर महाराष्ट्रातील एकमेव धावपटू प्रणय उपासे याने तृतीय क्रमांक मिळवत कांस्य पदक जिंकले आहे.मागील वर्षी देखील पटना ( बिहार ) येथे पार पडलेल्या स्पर्धेत त्याने चौथा क्रमांक प्राप्त केला होता. ब्रम्हपुरी ही क्रीडा नगरी म्हणून ओळखली जाते. अनेक खेडाळू यापूर्वी अनेक स्पर्धांमध्ये चमकले आहेत. प्रणयच्या यशाने ब्रम्हपुरी शहराच्या शिरेपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. प्रणयचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

# चकलंबा जि, प, गटातुन परमेश्वर वाघमोडे यांचा निवडणूक लढवण्याचा निर्धार!

सर्वसामान्याचा कामी येणारा अवलिया

चकलंबा (प्रतिनिधी ) :- गेवराई तालुक्यातील चकलंबा जिल्हा परिषद गटातुन परमेश्वर महाराज वाघमोडे सर यांनी निवडणूक लढविण्याचा निर्धार केला असुन, सतत जनतेत असणारा नेता अशी त्यांची ओळख आहे, राजकारणा बरोबरच समाजकारण अशी त्यांची विचार धारा असुन, अनेकांना संकट काळी देवदुता प्रमाणी धावुन जाण्याची धमक त्यांच्या रक्तात आहे,

गेवराई तालुक्यातील अत्यंत महत्वाचा समजला जाणारा चकलंबा जिल्हा परिषद गट हा



जिल्हा परिषदीचे नांदी ठरला आहे, अहिल्यानगर जिल्हाच्या सरहद्दी लगद असणारा गट आहे, सर्व जाती धर्माचे जनता या गटात राहाते, जिवाला जिव देणारे देव माणसे येथेच अशी अगळी वेगळी रचना असणाऱ्या जि, प, गटात सर्वसामान्य लोंकाचा चेहरा असणारे परमेश्वर वाघमोडे यांनी या गटातुन ठप्प पणे उभा राहण्याची निर्धार केला आहे, या भागात समाजकार्य बरोबरचं पिडीत असाह्याना मदत


करणे हा त्यांचा जन्म जात पिंड त्यांनी सतत गोरगरीब यांना रुग्ण सेवासह अनेकांना सढळ होतानी मदत करत या भागातील अनेक जणाचे संसार घडविण्याची काम प्रमाणिक पणे काम केले आहे, त्यांच्या कार्याची पावती म्हणून मिनी मंत्रालय जि, प, मध्ये ते इनटरी करणार आहेत. त्यांना चकलंबा गटातुन भरमसाठ मतदान रुपी आशिर्वाद मिळणार आहेत. यात मात्र शंकाच नाही

# आमदार श्यामसुंदर शिंदे यांचे चिरंजीव व स्नुषा यांनी जिल्हा परिषद निवडणूक लढवावी..!!

प्रतिनिधी : शिवहार गालफाडे
( दै. महाभारत )

लोहा कंधार मतदारसंघाचे माजी आमदार श्यामसुंदर शिंदे यांचे चिरंजीव तथा लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे विद्यमान सभापती विक्रांत पाटील शिंदे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. अनुजाताई विक्रांत शिंदे या आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद सार्वत्रिक निवडणूक सर्व ताकदीनिशी लढविणार असल्याचे त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार चर्चा पहावयास दिसून येत आहे, जिल्हा परिषद निवडणुकीचे नुकतेच आरक्षण सोडत झाली असून लोहा तालुक्यातील उमरा सर्कल सर्वसाधारण, कलंबर (बु) सर्वसाधारण





स्त्री, वडेपुरी सर्वसाधारण स्त्री , तर कंधार तालुक्यातील फुलवळ सर्वसाधारण स्त्री, पेठवडज सर्वसाधारण, शिराढोण सर्वसाधारण असे आरक्षण सोडत झाली आहे, सभापती विक्रांत पाटील शिंदे हे उमरा, शिराढोण, पेठवडज या जिल्हा परिषद( सर्वसाधारण) सर्कल मधून निवडणूक लढवावी व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. अनुजाताई विक्रांत शिंदे या फुलवळ, कलंबर( बु), वडेपुरी (आरक्षण सर्वसाधारण स्त्री) या सर्कल मधून जिल्हा परिषद निवडणूक लढवावी असा कार्यकर्त्यांचा आग्रह आहे.

सभापती विक्रांत पाटील शिंदे व त्यांच्या पत्नी सौ. अनुजाताई विक्रांत पाटील शिंदे या होऊ घातलेल्या जिल्हा परिषद निवडणूक पूर्ण ताकदीनिशी लढवाव्यात आणि आम्हा कार्यकर्त्यांना बळ द्यावे असा आग्रह दिसून येतो.मा.आमदार श्यामसुंदर शिंदे व सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई श्यामसुंदर शिंदे व विक्रांत दादा शिंदे मित्र मंडळाचे कार्यकर्ते कामाला लागले असून आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये लोहा कंधार मतदार संघात रंगत येईल असे दिसून येते.

# पुढील दोन दिवसांत जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळणार!

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे जलनायक मयंक गांधी यांना आश्वासन

परळी / विकास वाघमारे
(दै.महाभारत)

ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांनी आज बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेऊन शेतकऱ्यांच्या विविध समस्या आणि अडचणी यांची सविस्तर चर्चा केली. मागील भेटीच्या वेळी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी ट्रस्टकडून करण्यात आली होती. या मागणीवर जिल्हाधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत शेतकऱ्यांना येत्या एक ते दोन दिवसांत मदतीचे वाटप केले जाणार असल्याचे आश्वासन




दिले.

तसेच अतिवृष्टीमुळे खरवडून गेलेल्या जमिनींचे पंचनामे करून संबंधित प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याचे काम येत्या काही दिवसांत पूर्ण करण्यात येईल, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. ग्लोबल विकास ट्रस्टकडून शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा केला जात असून, नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदतीचा हात मिळावा, यासाठी जलनायक मयंक गांधी प्रयत्नशील आहेत.

# नवनियुक्त उपविभागीय पोलीस अधिकारी किरण भोंडवे यांची रात्रीला धाडसी कारवाई

माहूर/ अरुण पवार
(दै. महाभारत)

माहूर तालुक्याला उपविभागीय अधिकारी पोलीस अधिकारी म्हणून नव्याने रुजू झालेले किरण भोंडवे यांनी ईवळेश्वर रस्त्यावर अवैधरित्या अवैधरित्या कुठलीही परवानगी नसताना ट्रॅक्टर मध्ये वाळू भरून नेत असताना रात्रीला पाठलाग करून ट्रॅक्टर पकडत पोलीस ठाण्यात आणून जप्त केल्याची धाडसी कारवाईची घटना दि १६ रोजी सायंकाळी साडेसात वाजता घडल्याने वाळू तस्करात खळबळ उडाली आहेपावसाळा संपण्याआधीच वाळू तस्करांनी नांग्या वर काढून नदी नाले ओढ्यातून वाळू तस्करी सुरू केल्याची चर्चा होत असतानाच नव्याने रुजू झालेले तरुण तडफदार उपविभागीय पोलीस अधिकारी किरण भोंडवे यांना माहिती मिळाल्याने वानोळा परिसरात वस्तीवर असताना कुपटी ते इवळेश्वर रस्त्यावर एक ट्रॅक्टर लाईट बंद करून जातानाचा आवाज आल्याने त्यांनी त्याचा पाठलाग केला इवळेश्वर जवळ त्यास अडवून तपासणी केली असता ट्रॅक्टर क्रमांक एम एच २९ बी व्ही ४११५ आढळून आला त्यामध्ये वाळू भरून दिसल्याने त्यांनी सोबतच्या पोलिसांना त्यास माहूर पोलीस स्टेशनमध्ये आणण्याचे सांगून पोलीस ठाण्यात आल्यानंतर त्यावर कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात आला आहेया कार्यवाहीत उपविभागीय पोलीस अधिकारी किरण भोंडवे यांचे सह पोउपनी शरद घोडके सपोउपनी पालसिंग ब्राह्मण पोका अवधूत कावडे नवनाथ कोरडे परमेश्वर मामीलवाड दत्तात्रय सोनटक्के यांचे सह पोलिसांनी कारवाई सहभाग घेतला उपविभागीय पोलीस अधिकारी किरण भोंडवे यांनी आल्या आल्याच लपून-छपून सुरू असलेल्या अवध व्यवसायावर प्रहार करणे सुरू करून वाळू तस्करांनाही दणका दिल्याने उपविभागीय पोलीस अधिकारी किरण भोंडवे यांचे अभिनंदन होत आहे

# पत्रकार बालाजी जगतकर यांना पितृशोक श्रावणराव जगतकर यांचे दु:खद निधन

परळी (दै.महाभारत)

आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ मार्गदर्शक तथा पत्रकार बालाजी जगतकर यांचे वडील व परळीतील सुपरिचित व्यक्तिमत्व श्रावणराव नामदेवराव जगतकर वय ७५ यांचे अल्पशा आजाराने १६ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री १, ३० दरम्यान निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी पाच वाजता भिम नगर येथील शांतीवन स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

श्रावणराव जगतकर मितभाषी, मनमिळावू स्वभावाचे व पँथरचे सक्रिय कार्यकर्ते होते. त्यांनी समाजकार्यात हिरीरीने सहभाग नोंदवला आहे. विद्युत निर्मिती थर्मल पावर स्टेशन येथे ते नोकरीला लागल्यानंतर त्यांनी आपली समाज सेवा व कार्य चालूच ठेवले होते. त्यानंतर विद्युत वितरण कंपनीत त्यांनी आपली सेवा दिली व त्याच ठिकाणी सेवानिवृत्त झाले. त्यांनी धार्मिक कार्यात सतत पुढाकार घेतला होता. त्यांच्याजाने एक मोठी पोकळी परळी शहरात निर्माण झाली आहे.

त्यांच्या पश्चात पत्नी,तीन मुले पत्रकार बालाजी जगतकर व दुसरा मुलगा राजू जगतकर बुलेट रेल्वे कतार येथे मॅनेजर आहे.एक मुलगी व सुना नातवंडे असा भरगच्च परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर १६ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता भीमनगर येथील शांतीवन स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.




# चकलांबा पोलिसांनी पकडले वाळू वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर

## १४ लाख १० हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त

चकलांबा (प्रतिनिधी )

पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी जिल्ह्यात अवैध धंद्यावर कठोर कारवायाच्या दिलेल्या सुचनेनुसार चकलांबा पोलिसांच्या वतीने कारवाईचा धडाका लावला आहे. मौजे राक्षसभूवन येथे गोदावरी नदी पात्रात वाळू ची अवैध चोरी करणारे दोन ट्रॅक्टर सपोनि संदीप पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी ताब्यात घेण्यात आले. या कारवाईत १४ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दिनांक १६.१०.२०२५ रोजी ०२.०० वाजता गोपनीय माहिती मिळाल्यावरून सापळा रचून पोलिसांनी गोदावरी नदी पात्रामध्ये दोन ट्रॅक्टर ताब्यात घेतले. यावेळी ट्रॅक्टरमध्ये वाळूची चोरट्या मार्गाने तस्करी करण्यात येतं असल्याचे समोर आले असून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, पोलीस उपधीक्षक श्री. कटके यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संदीप पाटील, रीळ चांदमारे पोह/ पवार, ,प्रशांत घोंगडे, विनोद सुरवसे यांनी केली.



## बेधडक

### शेतकऱ्यांचा प्रश्न...!

अतिपावसाने शेतकऱ्यांचा
प्रश्न बनला आहे गंभीर,
नेहमीप्रमाणे शासन म्हणते
आम्ही पाठीशी आहे खंबीर..!

सरकारने फक्त बोलाचा भात
अन बोलाचीचं कढी ठरू नये,
प्रश्न सोडवण्यासाठी भरभरून
मदत करणं विसरू नये...!!



-प्रा.एस खंडागळे
पाटोदा (बीड)
मो.९६५७२८४४४४